॥ श्री ॥

उपनिषद हा अन्य ग्रंथाप्रमाणे केवळ एक ग्रंथ नाही. ती जड अशी विद्या नाही. इतकेच नाही तर उपनिषद म्हणजे नुसते शब्द सुद्धा नाहीत. आणि असलेच तर ते श्रुतींचे शब्द आहेत. गुरु शब्द उच्चारतात. शब्द विरुन जातात परंतु शब्द संपले तरी त्यातून प्रतिपादन केलेले ज्ञान लोप पावत नाही. यातील प्रत्येक शब्दाचा केंद्रबिंदु हा आत्मवस्तु किंवा आत्मचैतन्य आहे. हे साक्षात चेतनशील असे शब्द आहेत. म्हणून श्रुती ही माता आहे.

हे ज्ञान माझ्यापर्यंत पोहोचले ते यंत्रवत् नाही तर ऋषीमुनींना ध्यानावस्थेत स्फुरलेले मंत्र त्यांच्या शिष्यांनी श्रवण, स्मरण करुन आपल्या शिष्य-प्रशिष्य यांना दिले. त्या मंत्रामधील काहीही न गाळता किंवा त्यात काहीही भर न घालता मूळ मंत्र आपल्यापर्यंत पोहोचले आहेत. ही अलौकिक व अपूर्व परंपरा आहे. गुरुशिष्यपरंपरा हा आपल्या संस्कृतीचा गाभा आहे.

उप + नि + षद
जवळ + निश्चयार्थक + संसाराचा ध्वंस करते.



© www.madhavaveeraghuveer.com

॥ श्री ॥

## दहा उपनिषदांची विभागणी —

१. ऋग्वेद — ऐतरेय

२. यजुर्वेद — कृष्ण — कठ, तैत्तिरीय, बृहदारण्यक
शुक्ल — ईशावास्य

३. सामवेद — केन, छांदोग्य

४. अथर्ववेद — प्रश्न, मुंडक, मांडूक्य

उपनिषदे का शिकायची ?
— अनुबन्धचतुष्टय —

१. ग्रंथाचा विषय काय आहे ?
२. तो ग्रंथ शिकण्यासाठी अधिकारी कोण आहे ?
३. ग्रंथ शिकण्यामागील प्रयोजन
४. ग्रंथ आणि विषय यातील परस्परसंबंध

ईशावास्याची धाटणी यजुर्वेदाप्रमाणे ज्ञानदायक आणि कर्मसंज्ञक आहे. थोडक्यात म्हणजे यात केवळ ज्ञानाचा उपदेश नाही तर ज्ञानाचा विनियोग ही आहे. विनियोग माहिती असल्याखेरीज ज्ञान असून नसून सारखेच आहे. ज्ञान हे स्वतःचा व इतरांचा फायदा करून देणारे असावे.
ऋषींचे तीन शिष्य — मंत्रविद्या — मृतसिंह

© www.madhaveeraghuveer.com

| MAR | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

| WK | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 14 | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 15 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 16 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 17 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 18 | 28 | 29 | 30 | | | | |

मंत्राचा ऋषि, देवता आणि छंद जाणून
घेतल्याशिवाय मंत्र पठण करू नये.

ऋषी - नारायण मानला आहे.
याचा अर्थ नारायण स्वरूप बनलेला कोणीतरी
आहे शून्य ऋषि आहे जो आपल्या नावाचा लोप
करू शकला. कोणी दध्यङ् आथर्वण मानतात.
तेन त्यक्तेन भुञ्जीथाः आणि पश्यामि हे सुचते.

देवता - परमात्मा

छंद - अनुष्टुप आणि त्रिष्टुप आहेत
परंतु मोकळे आहेत.

८ वा व १६ वा मंत्र हे फक्त त्रिष्टुप आहेत.

## OBJECTIVES THIS MONTH

| DATE | DESCRIPTION | REMARKS |
|---|---|---|
| | | |

**2014**

MARCH '14

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |

MAY '14

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |

© www.madhaveeraghuveer.com

4 ऑक्टोबर 2014

।।श्री।।

वेदांचे चार भाग पडतात. मूळ संहिता, ब्राह्मण, आरण्यक व उपनिषद! उपनिषद हा शेवटचा भाग म्हणून त्याला वेदांत म्हणतात.

१. ऋषिमुनींना ज्या स्फुरल्या त्या मूळ मंत्र्या मूळ संहितेत येतात.

२. ते मंत्र म्हणत करावयाच्या यज्ञविधीबाबत माहिती ब्राह्मण ग्रंथात येते.

३. आरण्यकात विधि व तत्त्व याबद्दल चर्चा आहे

४. उपनिषदात परब्रह्म व त्याच्या प्राप्तीसंबंधी विचार, असे साधारण स्वरूप आहे.

प्रत्येक वेदाची अनेक उपनिषदे आहेत. त्यातील अकरा उपनिषदे प्रमुख मानली गेली आहेत.

ईश, कठ, केन, प्रश्न, मुंडक, माण्डूक्य, ऐतरेय, तैत्तिरीय, श्वेताश्वतर, छांदोग्य व बृहदारण्यक

— ईश किंवा ईशावास्योपनिषद —

शुक्ल यजुर्वेदाच्या काण्वशाखीय संहितेचा चाळीसावा अध्याय म्हणजे ईशोपनिषद!

आधीच्या ३९ अध्यायात कर्मकांडाचे विवेचन आहे तर या अध्यायात तत्त्वज्ञानाचे विवेचन आहे.

हे उपनिषद अतिशय लहान म्हणजे केवळ १८ मंत्रांचे आहे. पण यात वैदिक किंवा व्यापक अर्थाने पाहिले तर वैश्विक संस्कृतीचा गाभा सांगितला आहे. त्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे हे उपनिषद आहे.

विश्वातील प्रत्येकालाच हितकारक, जीवनाचा मार्ग दाखवणारे हे उपनिषद आहे. परमेश्वराविषयी आपल्या मनात असणाऱ्या बऱ्याच प्रश्नांना योग्य उत्तरे देण्याचे काम हे उपनिषद निश्चितपणे करते. ज्या परमशक्तीतून हे विश्व निर्माण झाले त्या शक्तीचे वर्णन करण्याचा

©www.madhaveeraghuveer.com

[शांतिमंत्राच्या संपुटात उपनिषदांची ठेव]

प्रयत्न हे उपनिषद करते. व त्या मूळ स्रोता-पर्यंत जाण्याचा मार्गही हे उपनिषद दाखवते.

या विश्वातील पाण्याच्या प्रत्येक थेंबाला सागरापर्यंत पोहोचण्याची ओढ असते. जर तो कुठेही जमिनीत जिरला नाही, अडवला नाही, त्याची वाफ झाली नाही तर प्रत्येक थेंबाचे अंतिम लक्ष्य समुद्र हेच असते. तसेच ज्याला बुद्धीचे, विवेकाचे वरदान आहे अशा प्रत्येक माणसाला विश्वाच्या मूळ स्रोता-पर्यंत जाण्याची ओढ असते. ते नक्की काय आहे हे जाणून घेण्याची जिज्ञासा असते. या सृष्टीचा निर्माता कोण आहे? या विश्वव्यापारावर ज्याचे नियंत्रण आहे तो सर्वशक्तिमान आहे तरी कसा? त्याचे यथार्थ स्वरूप जाणता येईल का?

ऋषींच्या मनातही असे विचार आले असणार. त्यांच्या तरल भावावस्थेमध्ये त्यांना काही स्फुरण जाणवले असेल. त्याचाच परिपाक म्हणजे हे उपनिषद!

प्रत्येक उपनिषदाचा शांतिमंत्र असतो.

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः॥

ॐ म्हणजेच प्रणव! ॐ म्हणजेच परब्रह्म!

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात - ऋषीमुनी त्याला ॐ म्हणून हाका मारू लागले. तेव्हा त्याला कळले की हे आपलं नाव आहे. तेव्हा तो ओ देऊ लागला.

त्या परब्रह्माचे स्मरण ॐ या नावाने केले आहे. तो परब्रह्म पूर्ण आहे. त्यात न्यून, कमतरता नाही. ते पूर्ण आहे, हे ही पूर्ण आहे. पूर्णातून पूर्ण निर्माण होते. पूर्णातून पूर्ण काढून घेतल्यावरही पूर्णच शिल्लक रहाते.

© www.madhuveerraghuveer.com

ही प्रार्थना नाही. हा शांतिमंत्र आहे. यात काहीही मागणे मागितले नाही. सगळीकडून येणारे जे ध्वनि आहेत त्यातील मांगल्य आम्ही ग्रहण करु अशी प्रतिज्ञा आहे. या मंत्रातून ईशावास्योपनिषदाचा गाभा व्यक्त होतो.

हे पूर्ण आहे, केवळ आहे, शुद्ध आहे. त्यात अन्य कुठलेही तत्व मिसळलेले नाही. हीण न मिसळलेल्या शुद्ध सोन्याप्रमाणे ते आहे. ती सोन्याची लगड आहे

सोन्याच्या लगडीतून थोडसे सोने काढले तरी लगडीत व त्या लहानशा तुकड्यातील सोनेपण समान आहे. तुकडा काढला म्हणून सोनेपणाला कुठेही धक्का लागला नाही, उणेपणा आला नाही. ते व हे दोन्ही पूर्ण आहे.

एका पूर्ण माणसातून दुसऱ्या पूर्ण माणसाचा जन्म होतो. दोन्ही आपापल्यात परिपूर्ण असतात. मुलाला जन्म दिल्याने आईच्या पूर्णत्वाला बाधा येत नाही किंवा मूलही अपूर्ण असत नाही.

किंवा शून्याला शून्याने गुणले, मिसळले, भागले तरी शून्यच उत्तर येते. शून्याला शून्याने भागले तर 'अमर्याद' हे उत्तर येते. परंतु नुसते शून्य हे निरर्थक असते. त्यामागे दुसरी संख्या असेल तर त्याला अर्थ असतो. इथे तर त्याला एकमेवाद्वितीय परब्रह्माचा भक्कम आधार आहे. आणि म्हणून हे शून्य अर्थपूर्ण आहे. शून्यापासूनच या विश्वाची निर्मिती आहे.

म्हणजेच शून्य हे कारण (Raw material) आणि विश्व हे कार्य (Finished Product) आहे.

जसे कारण तसे कार्य / जशी माती तसे मडके / त्यामुळे ते परब्रह्म व ही सृष्टी दोन्ही परिपूर्णच आहेत. ते स्वयंपूर्ण आहे. त्याला कशाचा आधार लागत नाही. कारण लागत नाही.

ॐ

विश्वशक्तीने विश्व निर्माण करण्याची इच्छा केली. इच्छा म्हणजे तरंग, लाट. त्या लाटांची गाज ॐ आहे. म्हणून आपल्या आवाक्यात येणारे त्याचे पहिले रूप म्हणजेच ॐ हे नादब्रह्म म्हणून त्याला ॐ नाव दिले. हा पहिला ध्वनि – प्रणवध्वनि! हा ॐ प्रथम लावला की त्याचे स्मरण होते आणि पुढे जे सांगणार आहे ते या संदर्भात आहे हे ही समजते. आणि जे सांगायचे आहे त्या पूर्वी त्या पूर्ण शक्तीचे स्मरण केले जाते.

शांतिमंत्र हा उपनिषदांतील विषयांकडे संकेत करणारा असतो. तो विषय आत्मसात करण्यासाठी आपली मानसिक तयारी करणारा असतो.

या मंत्रपठणाने आध्यात्मिक, अधिभौतिक व आधिदैविक सर्व तापांचे निरसन व्हावे.

मंगलाचरणाची आवश्यकता

ग्रंथाच्या आरंभ व मध्य मंगलकारक असावा. निर्विघ्नसमाप्त्यर्थम् व ईप्सितफलप्राप्त्यर्थम्।

कोणत्याही कार्यपूर्तीमध्ये तीन घटक असतात – १. प्रयत्नम् २. कालम् ३. दैवम्।

हे तिन्ही घटक अनुकूल करण्यासाठी शास्त्रामध्ये मंगलाचरण सांगितले आहे.

१. साध्याच्या दिशेने केलेले कष्ट म्हणजे प्रयत्न। दिशाहीन केलेले कष्ट म्हणजे व्यर्थ परिश्रम.

२. सातत्याने, दीर्घकाळ, एकच एक साधना करणे म्हणजे निष्ठा – जन्मोजन्मी आम्ही बहुपुण्य केले –

३. साध्यप्राप्तीमध्ये कित्येकदा दृश्य-अदृश्य, ज्ञात-अज्ञात प्रतिबंध, अनेक प्रकारची संकटे येत असतात. पुष्कळ प्रयत्न करून अपयश येतात. कर्मफळ हे मनुष्याधीन नाही.

© www.madhaveeraghuveer.com

दैव हा घातक अनुकूल व्हावा असे प्रत्येकाला वाटते.
ड्रायव्हर - गाडीच्या चक्राला नमस्कार करतो.
दुकानदार - दुकानाच्या पायरीला नमस्कार करतो.
अभिनेता - रंगमंचाला नमस्कार करतो.
रोज झोपताना सुद्धा उद्या मी धडधाकट उठावे यासाठी ईशस्मरण करावे.

साधकाच्या मनामध्ये ज्ञानजिज्ञासा निर्माण होणे, साधना करण्यासाठी अनुकूल असे मनुष्यशरीर प्राप्त होणे, सद्गुरूंची प्राप्ती होणे, शास्त्राचे श्रवण करायला मिळणे ही त्या भगवंताचीच अपार कृपा आहे. विद्येचा आरंभ करणे हा सर्वश्रेष्ठ संस्कार मानला आहे. विद्येचा संस्कार जिह्वाग्रावर केला जातो. विद्यारंभ करण्यापूर्वी गुरु व शिष्य हे दोघे मिळून मंगलाचरण करतात. भगवंताला आवाहन करतात. गुरुपरंपरेचे स्मरण करणे हा त्याचा एक भाग आहे. दुसरी गोष्ट म्हणजे गुरु शिष्य संप्रदायाचा हा शिष्टाचार आहे आणि तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे अहंकाराचा निरास करण्यासाठी मंगलाचरण केले जाते. कारण ज्ञानग्रहण करताना सूक्ष्म व एकाग्र बुद्धीबरोबरच प्रगल्भ, परिपक्व व दैवीगुणसंपन्न मन आवश्यक आहे. गीता अध्याय १३ (७ ते ११) आणि श्रद्धा असणाऱ्यालाच ज्ञानाची प्राप्ती होते.

शांतिपाठ तीन प्रकारचे असतात.
१ नमस्कारात्मक - गुरु व शिष्य दोघेही परमेश्वराला नमस्कार करतात.
२. आशीर्वादात्मक - गुरु हे शिष्याला आशीर्वाद देऊन अनुग्रह / कृपा करतात.
३. वस्तुनिर्देशात्मक - यात आत्मवस्तूचे प्रतिपादन केले जाते. जीवब्रह्मैक्यज्ञान सांगितले जाते.

©www.madhaveeradhuveer.com

पूर्ण + पूर्ण = पूर्ण आणि
पूर्ण - पूर्ण = पूर्ण हा सिद्धांत सांगत असताना श्रुती अदस् आणि इदम् ही दोन सर्वनामे वापरते. पूर्ण हा शब्द common आहे.
अदस् म्हणजे लांबचे पण जे इंद्रियांच्या कक्षेत येते तद् म्हणजे सुद्धा लांबचे पण जे इंद्रियांच्या कक्षात येत नाही म्हणजे हिमालय, गंगा इ० आणि इदम् म्हणजे जवळचे हा, ही, हे जे डोळ्याने दिसते न. इदम् म्हणजे जवळचे, देहाला चिकटलेले तर अदस् म्हणजे दूरवरचे पण डोळ्यांना दिसणारे - सूर्य, चंद्र, तारे.
सर्व निर्मित वस्तूंना तीन प्रकारच्या मर्यादा असता.
१. देशमर्यादा - प्रत्येक वस्तूला तिचे मोजमाप आहे. एखाद्या मोठ्या मैदानापासून लहानशा रवणीपर्यंत प्रत्येकाला मोजमाप आहे. तिला आकारमान आहे. एक वस्तु एका वेळी एकाच स्थानात उपलब्ध असू शकते. दुसऱ्या स्थानात त्या वस्तुचा अभाव असतो. यालाच देशमर्यादा असे म्हणतात.
२. कालमर्यादा - प्रत्येक निर्मित वस्तु ही कालाने बद्ध आहे. त्या वस्तूला जन्म, प्रारंभ (Begining) आहे. माणसाला जन्मपत्रिका आहे. एखादा पर्वत, नदी, इमारत यांना निर्मितीकाळ आहे. ही कालमर्यादा आहे.
३. वस्तुमर्यादा - प्रत्येक वस्तूला स्वतःचे स्वतंत्र, विशिष्ट असे गुणधर्म आहेत. त्यामुळे एक वस्तु दुसरी वस्तु होऊ शकत नाही. गुलाबाचे फूल वगळे, कमळाचे फूल वगळे, मुंगी कधी हत्ती होणार नाही. पर्वत कधी नदी होणार नाही. प्रत्येक वस्तुला वस्तुनिष्ठा आहे. दोन व्यक्तींचे चेहरे पद्धी सारखी असेल पण ती व्यक्ती १०० % दुसऱ्या व्यक्तीसारखी होऊ शकणार नाही.



© www.madhaveeraghuveer.com

याप्रमाणे सर्व निर्मित वस्तु देश-काल-वस्तु परिच्छिन्न मर्यादित, विकारयुक्त व नाशिवंत आहेत. ६ प्रकारचे विकार आहेत. सर्व अपूर्ण, अल्पव्यापी आहेत. अल्प शक्तिमान आहेत. परंतु ते परब्रह्मतत्त्व पूर्ण आहे. त्यामध्ये विकार नाहीत. भेद नाहीत.

भेद तीन प्रकारचे असतात

१. स्वगत भेद - एकाच देहाचे भिन्न अवयव एकाच शरीरात हाताचा आकार, कार्य वेगळे, डोळा वेगळा पोट वेगळे.

झाडाची पाने, फुले, खोड, फांद्या, डहाळी, मुळे हे सर्व आकाराने वेगळे, कार्य वेगळे, गरजा वेगळ्या, घरातील भिंती, दार, खिडक्या, फरशी सर्व वेगळे आहेत.

२. सजातीय भेद - एकाच जातीतील भिन्नता एकाच फळाच्या विविध जाती. उदा० आंबा - हापूस, पायरी, रायवळ, तोतापुरी, लंगडा, केशर. किंवा तांदळाच्या जाती - आंबेमोहर, बासमती, कोलम, उकडा, चिनोर, देवभात, साळी. माणूस म्हटला तरी गोरा, काळा, उंच, बुटका, नाकेला नकटा असे अनेक भेद असतात.

३. विजातीय भेद - पूर्णतः वेगळे असणे कुत्रा, माणूस, हत्ती, फुलपाखरू, मासा, किडा, पक्षी यात कोणतेच साम्य नाही. दिसण्यात, आकारात, आहारात, बुद्धी, अवयव, प्रजनन यात कशातच कुठलेच साम्य नाही. ते विजातीय आहेत.

परंतु हे तीनही भेद ज्यात किंचितही नाहीत असे ते पूर्ण असते. पाण्याच्या तळ्यातील पाणी, पिंपातील पाणी व पेल्यातील पाणी यात भेद नाही. तसेच पोत्यातील साखर व वाटीतील साखर

एकत्व आहे म्हणजेच ते पूर्ण आहे.
तो ईश आहे.

हे सर्व विश्व म्हणजे एक विराट पुरुष असून आपण सर्वजण परस्पर संबंध आहोत त्यामुळे इतरांची पुष्टि करणे म्हणजे माझी पुष्टि करणे. सर्वांना सांभाळले तरच मी खऱ्या अर्थाने सुखी होईन.

तो परिभू म्हणजे सर्व बाजूंनी विविध प्रकारांनी विविध रूपांमध्ये स्वतःला प्रगट करण्याची क्षमता असलेला आहे. तोच झाडे बनतो, तोच पक्षी बनतो, मलाही यानेच आतून बाहेरून वेढून टाकले आहे. जे मला मिळाले आहे ते सर्व याचेच आहे. त्याबद्दल कृतज्ञ रहायला हवे.

ज्या परमशक्तीतून हे विश्व निर्माण झाले त्या शक्तीचे वर्णन करण्याचा प्रयत्न हे उपनिषद करते वेदांचे, उपनिषदांचे पठण व अध्ययन करणाऱ्यांनाही सद्गती प्राप्त होईलच असे नाही. ज्ञानाच्या, तपाच्या जोरावर ब्रह्म लोकापर्यंत पोहोचता येईल. पण ब्रह्मांडाच्या पलीकडे पोहोचण्यासाठी विनम्रता हवी. अहंकाराचे संपूर्ण विसर्जन हवे. शरणागती हवी. गुरुंना नम्रभावाने शरण गेल्यास ते परमगुह्य ज्ञान देतात. शुद्ध संकल्पाने सत्कृत्य करीत जावे. ईश्वराने निर्मिलेल्या विश्वाचे चक्र नीट चालेल या दृष्टीने कर्म करावे. हळूहळू मन शुद्ध होत जाईल. त्या चक्राची लय पकडता येईल मग गुरुकृपेचा क्षण जवळ येईल. तो आपल्याला पार घेऊन जाईल व त्या विराटशक्तीच्या अनुभवाने आपण त्यात एकरूप होऊन जाऊ. हा सर्व प्रवास या ईशावास्यात सांगितला आहे. त्याच्या पहिल्या मंत्रात सर्व सार आले आहे.
हे उपनिषद महत्त्वाचे व त्यातही पहिला मंत्र विशेष महत्त्वपूर्ण

© www.madhaveeraghuveer.com

आहे. परमात्म्याच्या विश्वचक्रात आपल्याला ते जाणता त्याच्या नालाशी ताल मिळवून नम्रतेने कसे जगावे हा बोध आपल्याला ईशावास्यातून मिळतो.

उत्पत्ती आणि नाश या दोन सीमांमध्ये जे पदार्थ नांदतात त्यांच्या समूहाला जगत् अशी संज्ञा आहे. या जगताचे अस्तित्व ज्या सत्तेने प्रकाशित होते तो ईश्वर! म्हणून हे विश्व म्हणजे ईश्वराचे घर आहे.

सोनयाचिया चंडिका। सुवर्ण शृंखलेचे देखा।
सोनयाचिया महिमा। नाही केला॥

तेन त्यक्तेन - पत्रं पुष्पं फलं तोयं

ईशावास्यमिदं सर्वं - वासुदेवः सर्वं ]

गोग्रास
काकबळी
वैश्वदेव

© www.madhaveeraghuveer.com

5 October 2014

ॐ ईशा वास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत
तेन त्यक्तेन भुञ्जीथाः मा गृधः कस्यस्विद्धनम्

जगत् - सतत प्रवाहरूपाने चालत असलेले अशा या जगात, सर्व विश्वात भरून राहिलेले ईशस्वरूप आहे. इथे प्रत्येही बदल होत असतो, सर्व सृष्टी क्षणाक्षणाला, कणाकणाने बदलत असते. या सर्व जगावर त्याचे नियंत्रण आहे. त्याने हे सर्व जग आच्छादले आहे. झाडाचे पान देखील त्याच्या सत्ते शिवाय हलत नाही. विश्वाच्या कल्याणासाठी त्याने ठरवलेल्या नियमांना ऋत म्हणतात.

सर्व विश्वात जर ब्रह्म भरून राहिले असेल तर आम्ही जगायचे कसे? अन्न कसे खायचे? पृथ्वीवर पाय तरी कसा ठेवायचा? श्वास तरी कसा घ्यायचा? त्याचे उत्तर आहे - तेन त्यक्तेन भुञ्जीथाः। आम्हाला जगण्यासाठी काही भोग घ्यावे लागतात. कृतज्ञ भावनेने ते भोग स्वीकारा. अशी त्यागाची भावना असेल जर नम्रतेने आवश्यक तेवढेच भोग स्वीकारले जातील. 'अन्न ब्रह्म आहे' अशी जर मनोमन जाणीव असेल तर ते मी आवश्यक तेवढेच घेईन. जिभलौल्य म्हणून घेणार नाही व वाया घालवणार नाही. परमेश्वर माझ्यासाठी जे करतो ते माझ्या हिताचेच आहे. ते आदराने, कृतज्ञतेने स्वीकारले तर मन समाधानाने भरून जाईल. समोर आलेले अन्न जर परमेश्वराचा प्रसाद मानले तर तो प्रसाद वाटून घेतला जाईल. पशु-पक्षी, ब्राह्मण अतिथी-अभ्यागत या सर्वांना देऊन मग सेवन केले जाईल. त्यागपूर्वक भोग हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. कुणाच्याही धनाचा लोभ नको. हावरटपणा नको. लावण्यवतीचे लावण्य, श्रमिकाचे श्रम, विद्वानाची विद्वत्ता हे सर्व धनच आहे. त्यांच्या संमतीने, योग्य मोबदला देऊन कृतज्ञतेने त्याचा स्वीकार करायला हवा. सर्व परमेश्वराचे



आहे अशी भावना असेल तर अहंकार कणा काढत नाही. कशावरही स्वामित्व गाजवू नये.



© www.madhaveeraghuveer.com

इथे कुठे म्हटलेले नाही. परमेश्वर या शब्दाचा
उपयोग केला नाही तर ईश म्हटले आहे.
ईश म्हणजे स्वामी, मालक, पिता! तो पालनही
करतो व शासनही करतो. तो सगळीकडे
भरून राहिला आहे. जिथे तो दिसतही नाही तिथे तो
आहेच. या विश्वात थोडीही अशी जागा नाही की
ज्यात तो नाही. समर्थ रामदास - वाटीभर स्थळ!

हा सूर्य, हा वारा, पाऊस, भूमी हे सर्व त्याने
आपल्यासाठीच निर्माण केले आहे. ते सर्व आदराने व
कृतज्ञ भावनेने स्वीकारायचे. देव माझ्या हिताचेच
करतो या विश्वासाने आनंदपूर्वक त्यात वावरायचे.
तरच समाधान लाभेल. हा प्रसाद आहे. तो वाटून
घ्यायचा. अन्न पाणी, हवा या सर्वांवर माझ्याप्रमाणेच
इतरांचाही अधिकार आहे. कारण ते सर्व देखील या
ईश्वराची लेकरे आहेत. पशुपक्षी, प्राणी, इतर गरजूंना
त्यांचा भाग प्रथम देऊ. त्यापूर्वी ज्याने हे दिले त्याला
अर्पण करू व मग सेवन करू. गोग्रास, काकबळी,
विश्वेदेव, माधुकरी, अतिथिसत्कार करून जे काही असेल
त्याचे सेवन आनंदाने करू. अन्नाला नावे ठेवणार नाही.
त्यागपूर्वक भोग हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे.

आपल्या कहाण्याही हेच सांगतात. एक भाग देवाला
एक भाग ब्राह्मणांना, एक भाग गायीला देऊन मग
आपण सेवावा. मला मिळालेले केवळ माझेच नसते तर
माझ्यामार्फत सर्वांना पोहोचवण्यासाठी असते. मी माध्यम
आहे. या भावनेने वागणे हीच ईश्वराची पूजा आहे. इतरांना
न देता केवळ स्वतःच भोगणे याला गीता चोरी म्हणते.

आपल्या मुखात जाणारा प्रत्येक घास हा दुसऱ्या
कोणाच्या तरी श्रमाचा आहे. शेतकरी, दुकानदार, हमाल,
गिरणीवाला या सर्वांचे हात त्यामागे आहेत. पंचमहाभूते
आहेत. त्या सर्वांचे निदान कृतज्ञतापूर्वक स्मरण करता



सहयोगी: प्रज्ञा: कृष्णा

अमानी मानदो मान्यो



यायला हवे. आणि त्यांच्या रूपाने आपल्या संपर्कात येणाऱ्यांना त्याचा योग्य वाटा देता यायला हवा.

भागवतामध्ये त्याची योग्य विभागणी सांगितली आहे. धर्मार्थ - यशार्थ - अर्थार्थ - स्वजनार्थ - कामार्थ
हा विवेक देताना पाळायचा आणि घेताना कुणाच्याही मर्जीविरुद्ध ओरबाडून काहीही घ्यायचे नाही. फुकटही घ्यायचे नाही. कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मोबदला द्यायचा, कृतज्ञता व्यक्त करायची आणि तरीदेखील जेवढे आवश्यक असेल तेवढेच घ्यायचे.

मी ट्रस्टी आहे, माध्यम आहे असे म्हटले की मग अहंकार फणा वर काढणार नाही. 'सब भूमि गोपाल की' असा विश्वास असला तर मी व माझे या कुंपणात अडकणार नाही. सर्व गोष्टी मनापासून कराव्यात पण त्यांचे स्वामित्व स्वतःकडे घेऊ नये.

पुत्रैषणा, वित्तैषणा व दारैषणा या तिन्ही एषणांचा त्याग करावा. ज्या साधकाला खरोखर शास्त्राध्ययन करायचे असेल त्याने अपरिग्रह व्रत स्वीकारावे. ज्याला श्रवण, मनन, निदिध्यासन साधायचे असेल त्याने संग्रहाचा त्याग करावा.

अत्यंत कमी गरजांमध्ये, विषयभोगाशिवाय किंवा अगदी माणसांच्याशिवाय मी जगू शकतो हे अनुभवायला हवे. कारण या सर्वांमुळे माझ्या साधनेत विक्षेप येतात.

धन ही कल्पित वस्तु आहे. पैसे कधी हरवत नसतात. ते केवळ एकाकडून दुसऱ्याकडे जातात.

पक्ष्याला जसे दोन पंख आवश्यक आहेत तसे त्याग असल्याशिवाय भोग घेऊ नये. त्यागानं आनंद लाभतो. आपली संस्कृती भोगमय नसून त्यागमय आहे.

परोपकाराय फलन्ति वृक्षाः
परोपकाराय दुहन्ति गावः।
परोपकाराय वहन्ति नद्यः
परोपकाराय सतां विभूतयः।

| MAY | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

अपशब्द घेतलेच नाहीत तर ते परत त्या व्यक्तींकडे जातात.



© www.madhaveeraghuveer.com

कौपीनवन्तः

भर्तृहरी - वयं दुकूलैः

SUNDAY

APR '14

13

103-262 WK-15

अज्ञानी पुरुष मात्र जेवढे भोग हावरटपणाने भोगतो तितके रोग तू होता असमाधानी होत जातो विषयांच्या आकर्षणाला बळी पडतो तेच विषय त्याचे जीवन असह्य करतात.

विषवत् इति विषयः।

या जगतातील तुझ्या वाट्याला जे काही आलंय ते तू भोग पण भोगताना हे लक्षात ठेव की ते तुझे नाही, तुझ्याकडे अनायासे आले आहे त्याचा तू विवेकाने उपभोग घे पण दुसऱ्याकडे जे आहे त्याच्याकडे दृष्टी सुद्धा फिरवू नकोस. त्याची हाव धरू नकोस. ते भोग पाहुणेपणाने भोग. हे दोन दिवसांचे आहेत याची पक्की खूणगाठ मनाशी बांध. मागणे सोडून दिले की भोगण्यात मजा येते.

आपण मागणे सोडू त्या दिवशी मनाची शांती गाढ सुखाची झोप, आनंद हे सर्व आपल्याकडे धावत येईल. तेन त्यक्तेन भुञ्जीथाः हा आयुष्याच्या तत्वज्ञानाचा मूलमंत्र या उपनिषदाने दिला आहे.

जीवनाच्या तत्वज्ञानाची आपली बैठक तयार झाली म्हणजे आपली श्रीमंती, ऐश्वर्य खरोखर वाढते आपण रूप संपन्न होतो. असे सुखाचे आयुष्य जगावेसे वाटते आणि जगावेसे वाटते असे म्हटल्यावर उपनिषदकार म्हणतात — मंत्र २रा

प्रगट ते जाणावे असार। आणि गुप्त ते जाणावे सार।
गुरुमुखे हा विचार। उमजो लागो।। ६.२.२७।।

जे जे काही निर्माण जाले। ते ते आधीच ब्रह्म व्यापिले।
सर्व नाशता उरले। अविनाश ब्रह्म।। ६.३.१८।।

©www.madhaveeraghuveer.com

| APR 2014 | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

मनुष्य दुसऱ्याच्या धनाची अभिलाषा का करतो? तर केवळ आळसात जगण्याची इच्छा!
आणि कर्म न करता आळसात जगणे म्हणजे जीवनाशी बेइमानी करणे. जेव्हा आम्ही कर्म टाळतो तेव्हा जीवन भाररूप होते.
पर धनाकांक्षा म्हणजे आयत्यावर कोयता!

गृध्: - गृध् धातुचे रूप - यावरूनच Greed शब्द

अ-दीना: स्याम शरद: शतम् - दीनवाणे न होता १०० वर्षे जगावे अशी वेदांची शिकवण आहे.

© www.madhaveeraghuveer.com

कुर्वन्नेवेह कर्माणि
जिजीविषेत् शतं समाः।
एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति
न कर्म लिप्यते नरे॥ २॥

अर्थ- अशा प्रकारे या जगात कर्म करीतच शंभर वर्षे जगण्याची इच्छा करावी. असे केल्याने मनुष्य कर्माने लिप्त होत नाही. त्यासाठी अन्य मार्ग नाही.

विश्व ही ईश्वराची लीला-क्रीडा आहे. त्या खेळात तुमच्याकडे जो भाग सोपवला आहे तो नीट जाणून करा व ध्यान समाधानाने त्यातून बाहेर पडा. शरीर हे असे यंत्र आहे की ते योग्य रीतीने वापरले तर अधिक चांगले चालते नाहीतर बिघडते. त्यामुळे शरीर, मन, बुद्धी सतत कार्यरत ठेवणे आपल्या हिताचे आहे. त्यात आळस, कंटाळा यांना थारा देऊ नये.

परमेश्वराने मला दिलेला प्रसाद सर्वांमध्ये वाटून द्यायचा आहे. कोणाकडून ओरबाडून घ्यायचा नाही. शिवाय निसर्ग नियमांना अनुसरून कर्म केली पाहिजेत. ती शास्त्रसंमत असावीत. अशी कर्मे सहजपणाने करायची आहेत. त्यातील कर्तृत्व काढून टाकायचे. अशी मीपणा सोडून केलेली कर्मे निर्लेप होतात. शिवाय अशा कर्मांचे श्रम होत नाहीत. कर्म करण्याचा आनंद मिळतो. व तो गोड तिथेच संपते. ते कर्म अकर्म होते व त्याची कर्मबंधनातून सुटका होते. याखेरीज कर्मबंधनातून सुटण्याचा अन्य मार्ग नाही.

संसार करताना तो दाईप्रमाणे करावा. मनापासून करावा. पण त्यात गुंतू नये. पत्रावर जर नाव, पत्ता, सही नसेल तर ते पत्र पाठवणाराकडे परत येणार नाही. तसेच कर्मावर 'मी' चा शिक्का नसेल तर फळ भोगावे लागत नाही. 'अहं' विरहित कर्मात कृतज्ञता असते. तिथे अहंकार राहत नाही. स्मृति - Code of Conduct स्त्री पुरुष व्यापारी, शेतकरी यांच्या वागणुकीचे नियम Do and Don't



मनुस्मृती, वराहमिहिर, देवल स्मृती अशा 23 स्मृती आहेत.

जो योग्य प्रकारे आपली विहित कर्मे करीत असतो, त्याला त्या कर्मांचे बंधन कधीही पडत नाही. प्रत्येकाचे प्रत्येकापुढे सहजपणे येऊन उभे राहिलेले स्वाभाविक काम असते.

कारखान्याचे दूषित पाणी नदीत सोडण्याचा मला कधीही अधिकार नाही. नदीवर केलेली ती बळजबरी आहे. निसर्गनियमांना अनुसरून मी कर्मे करायला हवीत. ती शास्त्रसंमत हवीत. ती सहजपणे करावीत.

फाशी देणाऱ्या मांगाला किंवा मांसविक्रय करणाऱ्या खाटकाला हत्येचे पाप लागत नाही, कारण तो त्याचे कर्तव्य कर्म करत असतो. परमेश्वराचे म्हणून कर्म करीत जगल्यास त्या कर्माचा लेप माणसाला लागत नाही, ते कर्म त्याला चिकटत नाही. ते अकर्म होते व त्याचे फळ भोगण्यासाठी त्याला जन्म घ्यावा लागत नाही. तो परमेश्वराची इच्छा पूर्ण करणारे उपकरण बनतो व कर्मबंधनातून मुक्त होतो म्हणजेच मृत्युंजय होतो.

या मंत्रात 'एव' हा शब्द वापरून कर्माची अनिवार्यता सूचित केली आहे. श्रुतीने ज्ञानाबरोबरच विहित कर्मांचे प्रतिपादन केले आहे. प्रत्येकाने वेदविहित कर्मांचे अनुष्ठान करावे. प्रथम दीर्घकाळ स्वतःच्या वर्णाश्रम धर्माप्रमाणे निष्काम भावनेने, निःस्वार्थपणे कर्मानुष्ठान करावे. सदाचार हा थोर सांडू नये तो।

धर्म म्हणजे अत्यंत नियमित चारित्र्यसंपन्न, नीतिनियमयुक्त असणारे जीवन - सत्यं वद। धर्मं चर। मातृदेवो भव।
धर्मनिष्ठ जीवन जगणारा पुरुषच आत्मनिष्ठा प्राप्त करू शकतो. जेव्हा धर्माचे उच्चाटन होते तेव्हाच अधःपतनाला सुरुवात होते. म्हणूनच श्रुती सांगते

अन्यथा इतः नास्ति। याशिवाय दुसरा मार्ग नाही.
तेव्हा अशी शंका येते की कर्म हेच मोक्षाचे साधन

असेल तर रात्रंदिवस एखादा माणूस इतकी कामे करत आहेत तर ती सर्व मुक्तच व्हायला हवीत. पण तसे करणे योग्य नव्हे.

कर्माच्या योग साधायला हवा. कर्म अशा कुशलतेने करावे की ज्यामुळे कर्म करूनही मनुष्य कर्मापासून अलिप्त राहू शकेल त्यालाच गीता कर्मयोग म्हणते.

योगः कर्मसु कौशलम्।

काट्याने काटा काढावा तसा निष्काम कर्माच्या सहाय्याने कर्मबंधनाचा नाश करावा. कर्मे तीच करायची फक्त त्यामागील दृष्टी बदलायची आहे.

संसारात कर्म करा, मन ईश्वरावर ठेवा.

कर्माच्या पलीकडे जाण्यासाठी कर्म करण्याचा हा आदेश मुमुक्षु साधकांसाठी आहे. मुक्त सिद्धांना तो लागू पडत नाही.

उपनिषदात कुठेही लवकर मरावे, इथून सुटका करून घ्यावी असे कुठेही सांगितले नाही.

१. जे सर्वत्र ईश्वराला पहात आहेत त्यांना शास्त्रांची आवश्यकता नाही.

२. ज्यांना ईश्वरप्राप्तीची इच्छाच नाही त्यांनाही त्याचा उपयोग नाही.

३. पण ज्यांना सत्यस्वरूप परमात्म्याचा साक्षात्कार व्हावा अशी तळमळ लागली आहे त्यांना शास्त्रांचा उपयोग होतो. ईश्वर पहाण्याची इच्छा असणाऱ्यांना तो कसा पहायचा हे ईश्वर शास्त्र दाखवून देते.

व्यष्टि व समष्टिचा आत्मा एकरूप झाला तर उन्नती होणे शक्य आहे.

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः।

© www.mauliveeraghuveer.com

जीवनाचा प्रत्येक क्षण न् क्षण सार्थकी
लावायला हवा - क्षणशः कणशश्चैव ------

अनेकशास्त्रं बहु वेदितव्यम्
अल्पश्च कालो बहवश्च विघ्नाः।
यत्सारभूतं तदुपासितव्यम्
हंसो यथा क्षीरमिवाम्बुमध्यात्।

'कर्माणि' बहुवचनी शब्द वापरला आहे. वर्णाश्रमाप्रमाणे वाट्याला आलेली कर्मे करायलाच हवीत. शिवाय नित्य, नैमित्तिक कर्मे केलीच पाहिजेत.
इथे शतं समाः म्हटले आहे.
आंबे लिंबांचा शेकडा १२० चा
नामस्मरणाचा १०८ चा
तसा मानवी आयुर्मान ११६ आहे.
प्रथम २४ वर्षे अध्ययन
मधली ४४ वर्षे कर्मयोग (गृहस्थाश्रम)
पुढची ४८ वर्षे चिंतन अशी योजना आहे.

©www.madhaveeraghuveer.com

असुर्या नाम ते लोका
अन्धेन तमसावृताः।
तांस्ते प्रेत्याभिगच्छन्ति
ये के चात्महनो जनाः॥३॥

आत्महत्यारे लोक मृत्युनंतर काळ्याकुट्ट अंधाराने वेढलेल्या असुर्या नावाच्या लोकाला जातात. कारण तिथे देहालाच महत्त्व आहे. असु म्हणजे प्राण/देह त्यातच रमणारे ते असुर!

मात्र एकदा त्या अधोलोकात गेल्यावर त्यांना आपला उद्धार करता येत नाही. त्यांना ऊर्ध्वगती मिळत नाही. केवळ देहातच गुरफटणारा, देहाचे चोचले पुरवणारा स्वतःचे नुकसान करून घेतो. तो आत्महत्यारा ठरतो.

☆ पुण्यवान मनुष्य पापाच्या भारातून मुक्त होत वर-वर म्हणजे ऊर्ध्वगतीला जातो, पण पापी माणसे पापाच्या भाराने खाली खाली/अधोगतीला जातात.

अतल, वितल, सुतल, तलातल, रसातल, महातल व पाताळ अशी सप्तपाताळे आहेत. हे आत्महत्यारे जीव त्याहीपेक्षा खाली-अंधाराने वेढलेल्या असुर्य लोकात जातात. सूर्य हा शक्ती देणारा, सद्बुद्धीला चालना देणारा आहे. तोच तिथे नसल्याने या जीवाचा उद्धाराचा मार्ग खुंटतो. केवळ देह माणसाला पूर्ण सुख देऊ शकत नाही.

आध्यात्मिक दृष्ट्या जीवदशेत आपल्या उद्धारासाठी काही केले नाही तर ते लोक भोगातच रमत रहातात. ते या चक्रातच, तामस वृत्तीत, 'मी'पणातच गुंतून पडतात. उद्धाराची संधी घालवणारे ते करंटे जीव असतात. ती आध्यात्मिक आत्महत्याच आहे.

ही अंधारकोठडी आपण टाळायला हवी.

☆ ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः।
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः।

© www.madhuveeraghuveer.com

उपनिषदात कुठेही भाबडेपणा नाही. जे आहे ते परखड सत्य आहे. अनुभवसिद्ध आहे.

ज्यांच्या अस्तित्वामुळे सगळीकडे प्रसन्न तेज पसरते ते सुर आणि ज्यांच्यामुळे तेज नाहीसे होऊन सर्वत्र अंधार पसरतो ते असुर. जे दुसऱ्यांचे तेज हरण करून फिके करतात. दुसऱ्यांच्या सद्गुणांवर आपल्या कुकर्माचे झाकण घालू पहातात.

येथे असुर म्हणजे केवळ राक्षस नाहीत तर ज्यांना पारमार्थिक स्वरूपाचे ज्ञान नाही. जे लोक स्वतःचे निर्गुण चैतन्यस्वरूप जाणत नाहीत असे अज्ञानी लोक म्हणजे असुरच आहेत. खरे तर पारमार्थिक अद्वय ज्ञानाच्या दृष्टीने देवता सुद्धा असुरच आहेत कारण त्यांना आत्मज्ञान नाही. ज्या स्थानामध्ये कर्मफळे उपभोगली जातात त्यांना इथे लोकाः म्हटले आहे.

स्वतःला श्रेष्ठ समजणारे साधकही अज्ञानानेच आवृत झाले असतात. तमसा म्हणजे गाढ अंधाराने.

अज्ञानी लोक आत्म्याचे हनन केल्यामुळे शोकमोहात्मक, सुखदुःखात्मक संसारामध्ये बद्ध होतात.

असुषु रमन्ते इति असुराः - या प्राणात किंवा जड देहातच जे रमतात ते असुर! ते आत्म्याचा विचारच करत नाहीत. असे जीव सप्तपाताळाच्याही खाली अंधाराने व्यापलेल्या असुर्य लोकात जातात. तिथे सद्बुद्धीला चालना देणारा सूर्य नसल्याने त्यांच्या उद्धाराचा मार्ग खुंटतो.

प्रेत्य म्हणजे प्र + इ धातुचे ल्यबन्त अव्यय प्रकर्षेण गमनम् म्हणजे कायमचे जाणे. हा लोक सोडून जाणे. पुण्य माणसाला पापाच्या भारातून मुक्त करते व वर वर म्हणजे ऊर्ध्वगतीला नेते तर पाप भारामुळे अधोगतीला नेते.

आध्यात्मिक दृष्ट्या जीवदशेत आपल्या उद्धारासाठी काही केले नाही तर ते लोक भोगातच रमतात.

ही एक प्रकारची आत्महत्याच आहे. मिळालेली उद्धाराची संधी ते हातची घालवतात.

आपल्यामध्ये जी चैतन्यशक्ती आहे त्या शक्तीला कुठेतरी दडपून ठेवणे. अज्ञानामुळे, अहंकारामुळे, लोभामुळे दाबून टाकणे म्हणजे आत्महनन। तेव्हा शहाण्या माणसाने असे करंटेपणाने वागू नये.

जीवनाची एक सुंदर व्याख्या केली आहे. जोपर्यंत आपण या जगामध्ये असतो तोपर्यंत असे काही जगावे की आपण आहोत, त्यावेळी जसे जग होते त्यापेक्षा आपण जाऊ त्यावेळेस जास्त चांगले झालेले असावे. जास्त सुखी झालेले असावे.

स्वतः प्रकाशमान व्हावे व इतरांना प्रकाशमान करावे. विजेच्या दिव्याचा प्रकाश अधिक प्रखर असतो. पण विजेच्या एका दिव्याने दुसरा दिवा लागत नाही. दुसऱ्याला तेजस्वी करण्याची क्षमता त्यात नसते. जी तेला-तुपाच्या दिव्यात असते.

तेलाच्या एका दिव्याने कितीतरी ज्योती उजळतात.

प्रेम याचा अर्थच मुक्त देण्याचीच ओढ. घेण्याचे नावच नाही. अशी माणसे म्हणजे सुर बाकीचे असुर

जीवने यावदर्थं स्थानं प्रदानं ततोऽधिकम्।
इत्येषा प्रार्थनाऽस्माकं भगवन् परिपूर्यताम्।

सगळ्याचा उपभोग घ्यावा पण देण्याची वृत्ती जास्त असावी. मालकपणाचे हव्यासाने बोजा वाढवू नये.

आम्ही ज्याची हत्या करायची नाही, ज्या तेजाला दडपायचे नाही किंवा जे आमच्या मनात कमळासारखे उमलावे असे वाटते ते आत्मतेज म्हणजे काय? असा प्रश्न पडतो. त्याचे उत्तर पुढील ३ ऱ्या मंत्रात दिले आहे.

देह मी ज्या वाटे नरा। तो जाणावा आत्महत्यारा।
देहाभिमाने येरझारा। भोगील्याच भोगी।। प. इ. पु.

| APR | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

6 October 2014

अनेजदेकं मनसो जवीयो
नैनद्देवा आप्नुवन् पूर्वमर्शत्।
तद्धावतोऽन्यानत्येति तिष्ठत्
तस्मिन्नपो मातरिश्वा दधाति ॥४॥

ते आत्मतत्त्व स्वस्वरूपापासून न ढळणारे, एक आणि मनाहूनही वेगवान आहे. त्याला इंद्रिये धरू शकत नाहीत कारण ते सर्वांच्याही आधी निघालेले आहे. जागेवरून न हलताच ते धावणाऱ्या सर्वांना मागे टाकत असते. ह्याच्या अस्तित्वामुळेच (त्याच्या अधिपत्याखाली) वायु सर्वांना आपापली कर्मे (व त्यांची फळे) विभागून देत असतो.

मातर म्हणजे अंतरिक्ष. पृथ्वी आणि आकाश यांच्या मधील जे अवकाश आहे त्याला मातर म्हणतात. त्या अंतरिक्षात जो भरून राहिला आहे तो मातरिश्वा! मातरि श्वयति इति मातरिश्वा जो आकाशात पुष्ट होतो तो वायु! सर्व आकाशात भरून राहिलेले जे प्राणतत्त्व आहे तो मातरिश्वा! हा जिथे जिथे भरून राहतो तिथे तिथे चैतन्य निर्माण होते

आत्मचैतन्य अनेजत् म्हणजे निश्चल, स्थिर आहे आणि तरीही ते मनापेक्षा गतिमान आहे असेही म्हटले आहे. ही दोन विधाने परस्परविरोधी वाटतात.

ते इकडून तिकडे जात नाही, हलत नाही, कंप पावत नाही. तरी ते सर्वदेशी असते. आपण स्थूल शरीराने एकदेशी असतो म्हणजे मी इथे आहे म्हणजे घरी नाही. किंवा पुण्यात आहे म्हणजे सोलापूरला नाही. पण हा एकाच वेळी सर्व ठिकाणी आहेच आहे. आणि त्याचा वेग मनापेक्षाही अधिक आहे.

विश्वामध्ये ज्या अनेक गतिमान वस्तु सांगितल्या आहेत त्याहीपेक्षा मनाची गती अधिक आहे. विज्ञाना प्रमाणे ध्वनीपेक्षा प्रकाशाची गती जास्त आहे. म्हणून पावसाळ्यात वीज चमकलेली आधी दिसते. नंतर

© www.madhaveeraghuveer.com

ढगांचा गडगडाट ऐकू येतो. विश्वामधील वस्तूंची गती सापेक्ष आहे. बाकीच्या वस्तूंचा किंवा शक्तीचा वेग मोजताना त्यातील अंतर विचारात घेतले जाते. समजा इथे मोठा स्फोट झाला तर त्याचा आवाज काही ठराविक स्थानापर्यंत जाईल परंतु मुंबईपर्यंत जाणार नाही.

मात्र मन हे ध्वनीपेक्षा, प्रकाशापेक्षा वेगवान आहे कारण मनाला अंतराचे बंधन नाही. क्षणात इथे तर क्षणात अमेरिकेला मुलाच्या घरी जाऊन पोहोचते इतकेच नाही तर ब्रह्मलोक, स्वर्गलोकापर्यंतही चक्कर मारून येते असे हे मन अत्यंत गतिमान आहे.

परंतु मनापेक्षाही आत्मस्वरूप गतिमान आहे. कारण जिथे जिथे हे मन जाते तिथे त्या आधीच हे आत्मस्वरूप पोहोचलेले असते.

मन हे एका स्थानापासून दुसऱ्या स्थानापर्यंत केवळ संकल्पाने जाऊ शकते. परंतु आत्मस्वरूपाचे मनानेही चिंतन करता येत नाही तर उलट त्याच्यामुळे मनाला चिंतनाची शक्ति प्राप्त होते तेच ब्रह्मस्वरूप आहे.

त्यामुळेच मनाला आत्मस्वरूप समजले असा दावा कोणीही करू शकत नाही.

यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः।
अविज्ञातं विजानतां विज्ञातं अविजानताम्।

जो ब्रह्मस्वरूप जाणतो असे म्हणतो त्याला निश्चितपणे परब्रह्मस्वरूप माहिती नाही आणि जो ब्रह्म जाणत नाही असे म्हणतो त्याला परब्रह्माचे स्वरूप समजलेले आहे. या दोन्ही विधानांचा अर्थ ज्याला स्पष्टपणे समजतो, त्यालाच खऱ्या अर्थाने आत्मतत्त्व समजलेले असते. हा खूप मोठा चर्चेचा विषय आहे.

थोडक्यात आत्मस्वरूप हे डोळ्यांना दिसणारे दृश्य, अनुभवयोग्य, इंद्रिययोग्य वस्तू नाही.

© www.madhaveeraghuveer.com

त्यासाठी शाखाचंद्रन्यायाने प्रथम अध्यारोप करून नंतर अध्यारोपाचा निरास श्रुती करते.
आणि म्हणूनच सर्वसामान्य जीवांना आत्मस्वरूप समजावे म्हणून त्यांना समजेल अशाप्रकारे मनसः जवीय हा शब्द वापरते.

आकाश हे सर्वव्यापी आहे. आकाशामध्ये जाणे येणे उठणे, बसणे, स्पर्श करणे या सर्व क्रिया होतात. आकाश स्वतः काहीही करत नाही. 'आकाश' या सर्व क्रियांचे अधिष्ठान आहे. आकाश सर्वांना जागा देते.

अवकाशयति इति आकाशः।

समजा एखादा घट घेऊन मी एखाद्या हॉल मध्ये गेले तर घटाकाश हळूहळू हॉलच्या आकाशात गेले असे म्हणावे लागेल. नक्की काय जाते? घट की घटाकृति की घटाकाश की नुसते आकाश? याचे उत्तर देणे कठीण आहे. घट इकडून तिकडे गेला की घटाकाशच गेल्यासारखे भासते. वस्तुतः घटाकाश कोठे येतही नाही, जातही नाही. ते असतेच. मग हे सर्व असे का वाटते? तर मी आकाशाकडे पहात असताना घटाच्या माध्यमातून, मठाच्या माध्यमातून पहाते. परंतु खरोखर घट तिथे पोहोचण्यापूर्वीही तिथे आकाश होतच. उपाधीच्या दृष्टीने घटाकाश, मठाकाश हा भेद मी निर्माण करते. वस्तुतः या सर्व कल्पना मिथ्याच आहेत.

या मंत्रात वायुचा (मातरिश्वा) उल्लेख आहे. वायु हा संवर्ग आहे. म्हणजे त्यात सर्व सामावलेले आहे. डब्यात डबा, डब्यात डबा असे एकात एक ठेवले तर एकच डबा दिसतो. त्यातील सर्व वस्तूंचा पसारा काढून दाखवता येतो व परत ठेवताही येतो. त्याप्रमाणे एका वायुपासून तेज, आप, पृथ्वी हा सर्व विस्तार निर्माण झाला. पण पुन्हा शेवटी ते सर्व वायुतत्त्वातच विरणार आहे. त्या वायूला जाणणे, त्याचे मूळ जाणणे हे वायुध्यानाचे

© www.madhaveeraghuveer.com

ध्येय असायला हवे. सर्वव्यापी चैतन्याला प्राणवायूचा स्पर्श झाला की तो जीव म्हटला जातो.
आत्मतत्त्व हे पूर्वमर्यादित म्हणजे आधीच निर्धारित किंवा पूर्वीच सर्व जाणणारे आहे.

रेल्वेमध्ये बसलो असताना जे स्थिर ते अस्थिर वाटते आणि जे अस्थिर आहे ते स्थिर भासते हा मायेचा प्रभाव आहे.

देव :- द्योतनात् प्रकाशनात् इति देवः।

जे संपूर्ण विश्वाला प्रकाशमान करतात ते देव।

संपूर्ण विश्वाला म्हणजे शब्द स्पर्श रूप रस गंध या पाच विषयांना प्रकाशित करणारी इंद्रिये म्हणजे देवच आहेत. त्यांच्या कक्षेमध्ये जे जे येते त्याच विषयांना इंद्रिये प्रकाशित करू शकतात. तितकीच त्यांची मर्यादा असते. इंद्रियांच्या अभिमानाबद्दल उपनिषदात एक सुंदर कथा आहे. त्यातून आत्मचैतन्याचे महत्त्व समजते. चैतन्यस्वरूप इंद्रियांच्या कक्षांच्या पलीकडे आहे. इंद्रियांचा व्यापार हा अनेकदा मनावर अवलंबून असतो. कधी कधी डोळे सताड उघडे असूनही समोरचे दिसत नाही. इंद्रियांच्या मागे मनाची वृत्ति असेल तरच त्या विषयाचे ज्ञान होऊ शकते. ∴ इंद्रियापेक्षा मन गतिमान व मनापेक्षा आत्मा गतिमान आहे. म्हणून मन किंवा इंद्रिये आत्म्याला प्रकाशित करू शकत नाहीत.

यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ॥ तैत्तिरीय 2.4

सामान्यतः स्थिति आणि गति एकत्र असणे शक्य नाही. असे सामान्य तर्क मानतो परंतु वेदांतात असे परस्परविरोधी वाटणारे तर्क आहेत. ते विशेष तर्क म्हणजेच वितर्क आहेत. त्याला Dialectics म्हणतात.

मनाचा वेग प्रसिद्ध असला तरी असली अनंत मने ज्याच्या एका कोपऱ्यात विरली त्याचा वेग किती महान असेल?

© www.madhaveeraghuveer.com

३ ऱ्या मंत्रातील

आत्महन् ही भाषा औपचारिक आहे. वस्तुत:
आत्म्याचा घात संभवत नाही. त्याच्यावर
कोणतीच सत्ता चालत नाही. परंतु सोयीसाठी
बुद्धिनाश म्हणजे आत्मनाश असे म्हटले आहे.
जना: — केवळ जन्मास आलेले / ज्यांनी नरजन्म
सफल केला नाही. संधि होती. नराचा नारायण बनू
शकत होते त्याऐवजी जनच राहिले. जंतु कोटीस पात्र ठरले.
आसुरी योनि — गीता मूढ योनि म्हणते./ पापयोनि.
योनि या अर्थासाठी इथे लोक शब्द योजिला आहे.
लोक — आलोक = प्रकाश —— लोचन Look.
असे लोक उत्तरोत्तर अधोगतिला जातात.
गीतेत माम् अप्राप्य एव म्हणजे माझ्याकडे वळत
नाहीत तोपर्यंत असे म्हटले आहे. हा सर्व अर्थ
अभिगच्छन्ति या शब्दातून व्यक्त होतो.
अभिमुखा: गच्छन्ति
जे पतनाकडे वळले ते उत्थानाकडेही वळू शकतात.

---

४ थ्या मंत्रातील चार चरणात अनुक्रमे मन, ज्ञानेंद्रिये
कर्मेंद्रिये आणि प्राण यांच्याशी तुलना करून आत्म्याची
शक्ती दाखवली आहे. वस्तुत: त्याची तुलना होऊ शकत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

SUNDAY

APR '14

27

117-248 WK-17

7 October 2014

तदेजति तन्नैजति तद्दूरे तद्वन्तिके।
तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यत: ॥५॥

एजति - हलतो, चालतो. 'उ' हे अव्यय आहे. त्याचा अर्थ आहे अत्यंत

तत् - असे ज्या ईशतत्त्वाला म्हणतात ते इकडून तिकडे जाऊ शकत नाही. कारण तिकडे सरकायला जागाच नाही. सर्वत्र तोच घनदाट भरला आहे. पण मग त्यात हालचाल नाही का? तर तसेही नाही. त्याला स्पंदन आहे, म्हणून स्फुरण आहे. ते चैतन्ययुक्त आहे. कारण अचेतनातून चेतन निर्माण होऊ शकत नाही. सर्वत्र चैतन्य भरलेले आहे. सर्वदूर तोच पसरलेला आहे. तो सर्वांच्या आत आहे, तसाच बाहेरही आहे. जवळही तोच आणि दूरही तोच आहे. अभक्तांना तो दूर आहे आणि भक्तांना अगदी जवळही आहे. असे परस्परविरोधी गुण धारण करणारा तोच एक असू शकतो. तो अनंत कोटि ब्रह्मांड नायक आहे. जेथपर्यंत आपली कल्पना जाईल तिथपर्यंत तो आहेच. आकाशाने आपल्याला पैस (Space) दिला म्हणून आपण त्यात वावरू शकतो.

जे स्थिर आहे ते वेगवान असू शकत नाही आणि ज्याला वेग आहे त्याला स्थिर म्हणता येत नाही. पण हा परमात्मा स्थिर असूनही वेगवान आहे.

आद्य शंकराचार्य म्हणतात - हा विरोध आत्म्याच्या बाबतीत दोषास्पद नाही. कारण आपल्या निरपेक्ष स्वरूपात त्यात कोणतीही गती संभवत नसली तरी तोच परमात्मा आपल्या सापेक्ष स्वरूपात सर्वत्र सर्व नामरूपात दिसत असतो.

तोच चालणारा आहे व न चालणाराही आहे.

तोच दूर व जवळ आहे. आत बाहेरही तोच आहे.

अचल असूनही चल असल्यासारखा भासतो. तो सर्व

© www.majhaveraghuveer.com

जगात भरून राहिला असला तरी तो पूर्णपणे त्यात मावत नाही. तो दशांगुळे भरून उरला आहे. पुरुषसूक्त सांगते पादोऽस्य विश्वा भूतानि त्रिपादस्यामृतं दिवि।

त्याचा एकच पाद काय तो विश्वाच्या रूपाने व्यक्त होत असून बाकी तीन अमृतमय आकाशात आहेत. सर्व जगत परमात्म्यात सामावले आहे परंतु परमात्मा त्याहून महान आहे. तो जगात सामावलेला नाही. दोरीच्या ठिकाणी दिसणारा साप दोरीतच असतो. तो तिथे 'येण्या' आधीही दोरी होतीच, आणि तो साप निघून जातानाही दोरीला जशीच्या तशी ठेवून असतो. तद्वतच परमात्म्याच्या ठिकाणी अज्ञानामुळे प्रत्ययाला येणारी अगणित विश्वब्रह्मांडे येतात जातात. परमात्मा त्यांच्यात नि त्यांच्याबाहेर नित्य अलिप्त असतो.

स्थिर आणि चर दोन्ही तेच आहे. असा व्याप्तिसूचक अर्थ घ्यायचा. दूर आणि जवळ हे शब्द काल आणि अवकाश सूचित करतात.
आतला पाहणारा आणि बाहेरचे दृश्य या उभयरूपाने परमेश्वरच नटला आहे.

© www.madhaveeraghuveer.com

यस्तु सर्वाणि भूतानि आत्मन्येवानुपश्यति।
सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते॥६॥

जो (साधक) सर्व भूतमात्रांना आत्म्यातच पाहतो आणि सर्व भूतांमध्येही आत्म्यालाच पाहतो, तो याच कारणाने (सर्वात्मदर्शनामुळेच) कोणाचीही घृणा करत नाही.

आपल्याला टिकण्यासाठी ही आत्मशक्ती सर्वांकडून श्रम करवून घेत आहे. ही आत्मशक्ती बहरावी म्हणून आपण काय करायचे हा विचार मनामध्ये येणे हे खऱ्या अर्थाने जागे होणे आहे. अशी जागी झालेली माणसे स्वतःमध्ये परमेश्वराचे दर्शन घेतात.

जुगुप्सा याचा एक अर्थ घृणा असा आहे. शिवाय गुप धातुचा अर्थ रक्षण करणे असा आहे.

जो सर्व भूतांमध्ये स्वतःला पाहतो व सर्व भूतांना स्वतःमध्ये पाहतो तो कुणाचीही घृणा करत नाही वा इतरांपासून कशाचे रक्षण करावे असे वाटत नाही. आत बाहेर सर्वत्र तोच भरून राहिला आहे. जसे या मानव-शरीर रूपात तो व्यक्त झाला आहे तसेच झाडांच्या, पशूंच्या रूपाने तोच व्यक्त झाला आहे. त्यामुळे जसा मी त्याचाच भाग असून त्याच्यातच आहे तसेच अन्य सर्वही त्याचेच भाग आहेत व त्याच्यातच आहेत. हे जो निरंतर अनुभवतो (अनुपश्यति) तो सर्वत्र त्याचेच दर्शन घेतो तो कुणाचीही घृणा करत नाही व दुसरा कुणी नसल्याने कुणापासून रक्षण करण्याचा प्रश्नच येत नाही.

आत्मौपम्य बुद्धीने सर्वांकडे पाहिले तर कशाचा शोक होत नाही, राग येत नाही, तिरस्कार वाटत नाही माझ्या आधी 'तू' हा सद्भाव जागा होतो. हे

© www.madhaveeraghuveer.com

चांगल्या सज्जनतेचे लक्षण आहे. यातूनच सत्प्रवृत्त माणसे तयार होतात. देवाने दिलेली संपत्ती 'त्याची' म्हणत भोगायची.

त्या परमपित्याचे नाव सांगत हे सर्व जग हक्काने उपभोगता येते. मात्र त्यासाठी आपली दृष्टी थोडीशी बदलायला हवी. केवळ स्वतःच्या सुखाचा विचार न करता इतरांचा विचार प्रथम करायचा.

स. कृ. देवधर – एका गृहस्थांकडे गेले. ते उत्तम साधक त्याचप्रमाणे पत्नीदेखील उत्तम निरूपण करीत असे. याच मंत्रावर चहाच्या टेबलवर निरूपण सुरू होते. प्राणिमात्रांविषयी कळवळा, त्यांच्या सुखात आपले सुख — मोकळकरणीसाठी चहा — पुन्हा भाष्य सुरू झाले.

प्रपंचामध्ये केलेल्या चांगल्या क्रिया हा परमार्थाचा पाया आहे. स्वार्थ हा दुःखाचे मूळ आहे.
टेबलवर एकत्र बसून जेवायला वाढून घेताना देखील दुसऱ्याला प्रथम वाढून मग स्वतः घ्यावे.
अशा क्रियांमध्ये नेरवारिना नसावी.
मुलाने दगडाने झाडावरचे फळ खाली पाडले असे जरी दृष्टीला दिसत असले तरी त्यामागचे त्या मुलाचे सामर्थ्य कारणीभूत आहे.

---

विजुगुप्सते – विनोबा आश्रम — काणे गृहस्थ – सोनाली
कंटाळा, घृणा, तिरस्कार हा अर्थ आहेच परंतु त्यापेक्षा सूक्ष्मभाव आहे. अक्षरशः अर्थ आपल्याला अलग करण्याची, गोपन करण्याची वृत्ति असा आहे.

© www.madhaveeraghuveer.com

| MAY | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

मोह म्हटले की द्वैत आले. इथे तर अद्वैत असेल तर मोह कुठून येणार?

Notes

अनुकूल आकर्षण

यस्मिन् सर्वाणि भूतानि
आत्मैवाभूत् विजानतः।
तत्र को मोहः कः शोकः
एकत्वम् अनुपश्यतः॥ ७॥

यस्मिन् विजानतः सर्वाणि भूतानि आत्मा एव अभूत् तत्र एकत्वम् अनुपश्यतः को मोहः कः शोकः।

जो सर्वत्र ईश्वराचे अस्तित्व अनुभवतो, या ब्रह्मस्थितीला जो येऊन पोहोचला आहे - तो त्या परमात्म्यानेच सर्व भूतांच्या रूपाने स्वतःला व्यक्त केले आहे असे जाणतो. असा निरंतर एकत्वाचाच अनुभव घेतो त्याला कुठला मोह राहणार वा कुठला शोक होणार!

मला - सामान्य माणसाला प्रत्येक भूत वेगळे दिसते. मी व मला ज्यांच्याबद्दल प्रेम आहे ते सर्व माझे वाटतात व बाकीचे सगळे दुसरे परके आहेत असे वाटते माझ्यातल्या अहंकारामुळे मी स्वतःला इतरांपासून वेगळे समजतो. तो अहं ईश्वरूपात विलीन झाला की मी मला वेगळा वाटणारच नाही. जसा माझा हात माझ्या शरीरापासून वेगळा नाही - तो त्या शरीराचाच भाग आहे त्याचप्रमाणे या संबंध विश्वाचा - विश्वरूपी देहाचा मी एक भाग आहे सर्व एकच आहे. एकाच धाग्याने बांधले आहे.

मत्तः परतरं नान्यत् किञ्चिदस्ति धनञ्जय।

मानवाचे जीवन पशुपक्षी, झाडे, हवा, पाणी या सर्वांवर अवलंबून आहे. त्या सर्वांतून नात्याचा एक धागा आहे.

अन्न वस्त्र, निवारा या माणसाच्या प्राथमिक गरजा असल्या तरी याव्यतिरिक्त निसर्गात ज्या गोष्टी आहेत त्यामुळे माणसाचे जीवन अधिक समृद्ध, संपन्न, सुंदर होत जाते.

जगायचे कसे हे समजून घेताना जगायचं कशासाठी हे ही ओळखता आले पाहिजे. या विश्वातील प्रत्येक भाग त्याला नेमून दिलेले कार्य व्यवस्थित करत राहिला तरच हे विश्व चांगल्या रीतीने चालेल. Smoothly

© www.madhaveeraghuveer.com

WK **ACTION PLAN** MAY '14

| WK | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 18 | | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 19 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 20 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 21 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 22 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

Energy never dies. [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

© www.madhaveeraghuveer.com

## OBJECTIVES THIS MONTH

| DATE | DESCRIPTION | REMARKS |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

APRIL '14

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |

2014

JUNE '14

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | |

या विश्वाच्या चक्रातील मी म्हणजे एक कल्पनसा दुवा किंवा स्क्रू आहे. एखादा भाग जरी अडकतडू किंवा स्वार्थी निघाला, एखादा स्क्रू जर ढिला किंवा फार घट्ट झाला तर मशीन नीट चालणार नाही.

हे सृष्टीचक्र नीट समजून घ्यायला हवे. हे हजारो वर्षे सुरळीतपणे न कुरकुरता सुरु आहे. त्याचा नियंता कोणीतरी आहे. माझे काम इतकेच की या यंत्राला बाधा न आणता मला त्यात वावरता यायला हवे.

विश्व हा विराट पुरुष आहे. त्यातील सर्व घटक सुस्थितीत राखायला हवेत. वादळ आले तर कचरा डोळ्यात जाऊ नये म्हणून आपण हाताचा आडोसा करतो. एका हाताला दुखापत झाली असेल तर गर्दीतून जाताना दुसऱ्या हाताने त्याचे रक्षण करतो इतकी सहजता सृष्टीत वावरताना आली पाहिजे. असे जर वागता आले तर माझ्याकडून हवा, पाणी प्रदूषित होणार नाही. जंगलतोड होणार नाही. पाण्याचा, अन्नाचा अपव्यय होणार नाही. दुसरा उपाशी असताना मला पोटभर जेवता येणार नाही. सर्व भूतमात्र हे या विराट पुरुषाचाच भाग आहेत. त्यांना संकटात लोटून मी एकटा सुखी होऊच शकणार नाही. मी उपभोग घेईन ते सर्वांना बरोबर घेऊन! गीतेमध्ये भगवंत म्हणतात,

परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ।

निःस्वार्थीपणाने एकमेकांची उन्नती करत तुम्ही परम कल्याणाला प्राप्त व्हाल.

**कृतज्ञता हा परमार्थाचा प्राण आहे.**

जो सर्व विश्वाला एकत्वाने बघतो त्याला मोह कशाचा व कुणाचा? आणि शोक तरी कसला? आकर्षण तरी कसले आणि विरह तरी कशाचा?

शोक आणि मोह बाहेर प्रत्यक्ष विश्वात नाहीत तर याचे मूळ कारण मनाची वृत्ती आहे. ज्ञानी पुरुषामध्ये

© www.madhaveeraghuveer.com

या शोक मोहाचाच अभाव असतो, कारण ज्ञानी पुरुष स्वतःच्याच स्वरूपाने पूर्णतः तृप्त, आप्तकाम असतो. जो आत्मरति असतो, आत्म्यावरच प्रेम करतो, तो स्वस्वरूपामध्ये स्वतःच्याच स्वरूपाने तृप्त संतुष्ट होतो. तोच कृतकृत्य होतो.

यस्त्वात्मरतिरेवस्यादात्मतृप्तश्च मानवः।
आत्मन्येव च सन्तुष्टस्तस्य कार्यं न विद्यते॥

ज्ञानी पुरुष आकाशाप्रमाणे सर्वव्यापी असणाऱ्या चैतन्यालाच पाहत असल्यामुळे त्याच्या अज्ञानग्रंथीचा पूर्ण नाश होतो.

योगरतो वा भोगरतो वा सङ्गरतो वा सङ्गविहीनः।
यस्य ब्रह्मणि रमते चित्तं नन्दति नन्दति नन्दत्येव॥

अशा स्थितीत निरंतर असलेला माणूस आनंदातच डुंबत असतो. कारण तो सर्वत्र ईश्वराचीच लीला पाहत असतो. ही स्थिती अनुभवणे म्हणजे विज्ञानमय होणे. त्यासाठी आत्मौपम्य बुद्धीने दुसऱ्याकडे पाहता यायला हवे. दुसऱ्यांच्या सुख-दुःखात समरस होता आले पाहिजे. लोकांनी माझ्याशी आदराने वागावे असे वाटत असेल तर त्यापूर्वी मी इतरांना आदर द्यायला हवा.

या मंत्राचा अर्थ आचरणात उतरण्यासाठी आधी आत्मौपम्य बुद्धीची पायरी चढायला हवी.

उन्हातान्हातून कुणाच्या घरी गेल्यावर आदराने बसवून थंड पाणी दिलं की कसे बरे वाटते. तशीच कृती माझ्याकडून सहजपणे घडायला हवी मनाला असे वळण लागण्याकरता ही गोष्ट सुरुवातीला जाणून बुजून करायला हवी. 'मी मी' चे गाणे म्हणत असताना हे मी चे धृवपद दुसऱ्या ठिकाणी नेऊन बसवावे. हे करता करता आत्मौपम्य बुद्धीची पायरी चढता येते आणि मग खरोखरच जाणवायला लागते की समोरची व्यक्ती आणि मी यात वस्तुतः काही फरक नाही.



© www.madhaveeraghuveer.com

आपणासी चिमोटा घेतला। तेणे प्राणी दुखावला। आपणावरून दुसऱ्याला। ओळखीत जावे।

कोणी टोचून बोलले तर माझ्या डोळ्यात टचकन पाणी येते तर मग मला इतरांना टोचून बोलण्याचा काय अधिकार आहे?

As you write more and more personal It becomes more and more universal.

आत्मौपम्य बुद्धी जागृत झाली की परकाया-प्रवेश किती सहज साधतो. मग मी आणि जगातल्या प्रत्येक गोष्टीतला दुवा समान आहे - एक आहे हा प्रकाश हृदयात पडतो. केवळ माणसातच नव्हे तर पशु-पक्षी झाडे-वेली, किडा-मुंगी सगळ्यांमध्ये एकच व्यवस्था आढळते. सूत्रे मणिगणा इव।

झाडाप्रमाणेच आपणही आपला संसार अतिशय कष्ट करून समृद्ध केलेला असतो. नानारूपाला आणलेला असतो. कौशल्याने रंगवलेला असतो. असा भरला संसार कुणाच्या तरी ताब्यात द्यायचा असतो. फुलाला हे कळायला हवं की जोवर आपण देठाला चिकटून राहू तोवर आपले फळ पिकणार नाही. फळाने पिकावे म्हणूनच फुलाने गळून पडलं पाहिजे हा निसर्गाचा कायदा आहे.

'मी' चा परीघ हा व्यापक करता यायला हवा. संबंध विश्वाच्या योजनेत सर्व माणसेच अंश आहेत. मग हेवा-दावा द्वेष-ईर्ष्या, क्षोभ-संताप, वैर-युद्ध करण्याची जरूरी नाही. नवविधा भक्तीतील हे आत्मसमर्पण आहे.

© www.madhaveeraghuveer.com

13 October 2014

**MONDAY**

**MAY '14**

# 5

125-240 WK-19

स पर्यगाच्छुक्रमकायमव्रणम् ।
अस्नाविरं शुद्धमपापविद्धम् ।
कविर्मनीषी परिभूः स्वयम्भूः ।
याथातथ्यतोऽर्थान् व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः ।

शाश्वतीभ्यः समाभ्यः (वर्षे) भवताम् ।

चौथ्या मंत्रापासून 'त्या'चे वर्णन सुरु आहे. परंतु या मंत्रात नेमकेपणाने स्पष्टपणे त्याचे ११ लक्षणांनी युक्त असे वर्णन केले आहे.

१. पर्यगात् - परिसमन्तात् अगात् । [illegible]

तो आत्मा सर्व बाजूंनी, सर्व दिशांना गेला व त्याने आकाशाप्रमाणे सर्व दिशांना व्याप्त केले. आकाश जसे घटाला अंतर्बाह्य व्यापून टाकते परंतु घटाने कधीही परिच्छिन्न, मर्यादित होत नाही तसेच आत्मचैतन्य संपूर्ण विश्वाला अंतर्बाह्य व्याप्त करते परंतु या विश्वातील कोणतीही वस्तु आत्मचैतन्याला मर्यादा घालू शकत नाही.

पुरुषसूक्तात वर्णन आहे

ॐ सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् ।
स भूमिं विश्वतो वृत्वा अत्यतिष्ठद्दशाङ्गुलम् ।

किंवा गीतेमध्ये १३ व्या अध्यायात याच अर्थाचे वर्णन

सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् । [illegible]

२. शुक्रम् - शुद्धं ज्योतिष्मत् दीप्तिमान् इत्यर्थः ।

आत्मा हा अत्यंत तेजस्वी, ओजस्वी असून दीप्तिमान स्वयंप्रकाशस्वरूप आहे. त्याच्याच प्रकाशामध्ये अव्यक्तापासून स्थावरापर्यंत सर्व विश्व प्रकाशमान होते.

तमसः परं उच्यते । गीता अ. १३.१८

आदित्यवर्णं तमसः परस्तात् असा श्वेताश्वतर उपनिषदात

न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं नेमा
विद्युतो भान्ति कुतोऽयं अग्निः ।
तमेव भान्तमनुभाति सर्वं
तस्य भासा सर्वमिदं विभाति । मुंडको २.२.१०

| MAY | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

अस्थि मांस रस रक्त मेद मज्जा शुक्र

शुक्र म्हणजे अत्यंत तेजस्वी। पुरुषाचे वीर्य हे त्याचे श्रेष्ठ सार असते. त्यामध्ये दुसरा जीव निर्माण करण्याचे सामर्थ्य असणारा शुक्र असतो. हा सर्व विश्वाचे सार सर्वस्व आहे. व विश्व निर्माण करण्याचे सामर्थ्य असलेला आहे.

धवलत्व हे शुद्धतेचे प्रतीक आहे. तसेच ते ज्ञान व तेजस्वितेचे सूचक आहे.

३. अकायम् - अशरीरः लिङ्गशरीरवर्जितः।

आत्मा उपाधिरहित आहे. लिंग म्हणजे सूक्ष्मशरीर। हा त्याच्याही अतीत आहे. ती एक शक्ती आहे.

४. अव्रणम् - त्याला व्रण किंवा क्षति पडू शकत नाही. त्याला इजा होत नाही. त्याला खरचटणे पडत नाही

५. अस्नाविरम् - स्नावाः शिराः यस्मिन् न विद्यते इति।

ज्याच्यामध्ये स्नायू, शिरा म्हणजेच नाडी, मज्जा, अस्थि रक्त, मांस वगैरे धातु नाहीत असा तो अस्नाविर आहे इथे स्थूल शरीराचा निषेध केला आहे. आमचे शरीर स्नायूंनी एकत्र बांधलेले आहे. त्याला स्नायु नाहीत. बंधनं नाही. तो सर्वत्र पसरलेला आहे. व्याप्त आहे.

६. शुद्धम् - निर्मलं अविद्यामलरहितम्। जीवाच्या अंतःकरणात असणारी अविद्याकामकर्म ही ग्रंथि म्हणजेच खरी अशुद्धी आहे. ज्याच्यामध्ये या ग्रंथीचा अभाव आहे तो अत्यंत शुद्ध असणारच. यात कारण शरीराचा निषेध आहे. त्याच्यात कोणतीही भेसळ नाही, किल्मिष नाही. त्याच्याखेरीज अन्य कोणतीही वस्तू त्यात मिसळली नाही.

७. अपापविद्धम् - धर्माधर्मादिपापरहितम्।

आत्म्यामध्ये धर्मादि पापपुण्याचा अभाव आहे. आत्मा हा कर्म - कर्मफलाच्याही अतीत आहे. चैतन्यामध्ये पाप - पुण्यात्मक कल्पनांचा पूर्णतः निरास होतो. आत्मा हा कर्मशून्य, नैष्कर्म्यस्वरूप आहे.

यातील हे सर्व शब्द नपुंसकलिंगी आहेत - अकायम्



© www.madhaveelaghuveer.com

अव्रणम्, अस्नाविरम्, शुद्धम्, अपापविद्धम्।
परंतु सुरुवातीला सः हे पुल्लिंगी सर्वनाम वापरले आहे व पुढे कविः मनीषी: परिभूः स्वयम्भूः हे सर्व पुल्लिंगी शब्दच योजले आहेत. त्यामुळे पहिली नामे ही पुल्लिंगी करून घ्यावीत.

८ कविः - क्रान्तदर्शी सर्वदृक् इति। कवी म्हणजे क्रान्तदर्शी सर्वदर्शी असा। जो ज्ञानाने सर्व पाहू शकतो, जाणू शकतो त्याला कवी असे म्हणतात. आत्मा हा सर्वश्रेष्ठ कवी आहे. तो त्रिकालदर्शी आहे.

नान्यः वेद सर्वाणि किंवा वेदान्तकृद्वेदविदेव चाहम्।

९ मनीषी - मनसः ईषिता सर्वज्ञः ईश्वरः इत्यर्थः।)
जो मनाला प्रेरणा देतो तो सर्वज्ञ ईश्वर म्हणजे चैतन्य होय. आत्मचैतन्यच मनाला सत्ता आणि स्फूर्ति प्रदान करते. ज्याप्रमाणे लोहचुंबक स्थिर राहतो परंतु त्याच्या सान्निध्यामुळे लोखंडाच्या तुकड्यांमध्ये चलनादि व्यवहार होतात. तसेच चैतन्य अनात्मउपाधीला चेतना देऊन कार्यरत करते. तेच चैतन्य सर्वांवर नियमन करते. दुसरा अर्थ मनीषी म्हणजे मनन करणारा आहे योग्य-अयोग्य याचा विचार करणारा आहे. विंचरून काढताना ज्याप्रमाणे केस न केस मोकळा होतो त्याप्रमाणे पृथक्करण करून विषयाच्या सर्व बाजूंनी, सर्व तत्त्वांनी विचार करण्याची शक्ती याच्याजवळ आहे.

१० (सर्वेषां) परिभूः - सर्वेषां पर्युपरि भवति इति परिभूः)
आत्मचैतन्य हे सर्वांच्यापेक्षा श्रेष्ठ, सर्वोत्तम असल्याने त्याला परिभू म्हटले आहे. तो क्षर व अक्षर पुरुषापेक्षा श्रेष्ठ असा उत्तम पुरुष आहे. तो कार्य-कारण, व्यक्त-अव्यक्त यांच्याही पलीकडे आहे. दुसरा अर्थ - सर्व बाजूंनी विविध प्रकारांनी, विविध रूपांमध्ये स्वतःला निर्माण करण्याची क्षमता असलेला असा आहे. यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः।

१९ स्वयंभू - स्वयं एव भवति इति स्वयंभू।
जो स्वत:च स्वत:च्या रूपाने प्रगट होतो त्याला स्वयंभू असे म्हणतात.

आत्मचैतन्याला निर्माण होण्यासाठी अन्य कोणत्याही कारणाची आवश्यकताच नाही. कारण नसल्याने त्याला जन्मही नाही. त्याला निर्माण करणारे त्याच्यापेक्षा श्रेष्ठ असे दुसरे कोणतेही कारण नाही. तेच एक अद्वय निरतिशय स्वरुप असून नित्य मुक्तस्वरुप आहे. त्याला निर्माण करणारा कोणीही नाही. तो पूर्वी होता आजही आहे व उद्याही असणार आहे.

अशा या ६६ लक्षणांनी युक्त अशा त्याचे वर्णन करण्याचे प्रयत्न केले आहेत परंतु ते अपुरे आहेत अशा अवर्णनीय, अनुर्वाच्य अशा त्याने सर्व बाजूंनी समाविष्ट होऊन पदार्थांना (अर्थान्) निर्माण केले केव्हापासून? तर शाश्वतीभ्य: समाभ्य: म्हणजे अनादि काळापासून! विश्वाची निर्मिती नक्की केव्हा झाली हे सांगता येत नाही. विश्वातील पदार्थ कसे तयार केले आहेत? तर याथातथ्यत: म्हणजे जसे हवे तसे.

ज्या ज्या गोष्टीत ज्याची ज्याची गरज आहे त्या त्या गोष्टीला तसे तसे निर्माण केले. माणसाला हात काम करण्यासाठी दिले. चालायला पाय दिले, रक्त शुद्ध करण्यासाठी श्वास दिले. रुधिराभिसरण, अन्नपचन या संस्था शरीरात तयार केल्या. त्यांचे कार्य यथास्थित सुरु आहे. मानवी आकलनशक्तीच्या पलीकडे काही गोष्टी आहेत परंतु त्यांचे नियोजन उत्कृष्ट आहे.

जिराफाला कोवळ्या पानांचे शेंडे खाण्यासाठी उंच मान दिली. हरणाला पळण्यासाठी बळकट पाय दिले. वाघ, सिंह, मांजरांना रात्री अंधारात दिसणारे व चमकणारे डोळे दिले. सर्पाला गती दिली. बेडकाला उड्या मारण्यासाठी योग्य असे असमान पाय दिले.

थोडक्यात त्याने निर्माण केलेली प्रत्येक वस्तू परिपूर्णच आहे. आवश्यक त्या सर्व गोष्टींनी सुसज्ज आहे.

माणूस माणसालाच जन्म देतो, कुत्रा कुत्र्यालाच जन्म देतो. आंब्याच्या झाडाला आंबेच लागतात. कारल्याला कारलीच लागणार ही त्याची चोख व्यवस्था आहे.

या विश्वाची, विश्वातील प्रत्येक गोष्टीची अंतर-व्यवस्था पाहिली की मन थक्क होते. या सर्व गोष्टींची किती बारकाईने त्याने आखणी केली आहे, प्रत्येक संभाव्य गोष्टीसाठी सर्व सोयी त्याने आधीच करून ठेवल्या आहेत.

परमेश्वराने जे पदार्थ, जे जीव निर्माण केले ते आवश्यक सर्व गोष्टींनी युक्त बनवले आहेत. माणूस घेतला तर ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, मन, बुद्धी, चित्त, अहंकार, प्राणपंचक आदि सर्व गोष्टी विचारपूर्वक त्याला दिल्या आहेत. श्वसनसंस्था, पचनसंस्था, रुधिराभिसरण, संदेशवहन, रोग प्रतिकारसंस्था, अशा अनेक कार्यशाली व व्यवस्था त्याला दिल्या आहेत. असे अनंत देह, अनंत योनी त्याने निर्माण केल्या. एकच एक असलेल्या परब्रह्मापासून वैविध्यपूर्ण जग कसे निर्माण झाले ते या 'याथातथ्य'ने सुचवले आहे.

शुक्र पर्यगात - अर्थान व्यदधात चा अर्थ दुसऱ्या रीतीने असाही लावता येईल. शुक्र-वीर्य व स्त्रीचे सार असलेले रज यांच्यात त्याने स्वतः समाविष्ट होऊन विविध प्रकारच्या जीवांची उत्पत्ती केली. नाही तरी आपण अनुभव घेतोच की त्याच्या कृपेशिवाय गर्भधारणा होत नाही.

याथातथ्य - आपल्या कर्मफलाच्या हिशेबाने बरोबर आम्हाला सर्व गोष्टी देतो. कमी नाही की

© www.madhavveeraghuveer.com

जात नाही. तो कोणावरही अन्याय करत नाही. कुणाचे पाप किंवा पुण्य तो घेत नाही किंवा देत नाही. काही माणसे आपल्या दुर्दैवाचे खापर देवावर फोडतात. परंतु त्याच्याकडे पक्षपात नाही. तो प्रत्येकाला त्याच्या कर्माचे योग्य ते फळ देतो. तो स्वामी आहे, आपण सेवक आहोत. तो चालवेल तसे चालावे. विश्वातले सारे नियम त्या परमात्म्यावरच अवलंबून आहेत. श्रुती हे सत्य आपल्या निदर्शनास आणून देतात व त्याला सर्वतोभावे शरण जाण्यास सुचवतात.

स्वामी विवेकानंदांच्या मते उपनिषदे ही उत्कृष्ट भक्तिशास्त्रे आहेत. ईश्वराची संपूर्ण शरणागती म्हणजे 'मी' चे स्वरूप ओळखणे. हा मी म्हणजे परब्रह्म आहे हे जाणणे. केवळ बौद्धिक आकलनातून जन्मलेल्या तथाकथित विश्वासाला नि भोळसटपणाला भक्ती म्हणण्याची चूक उपनिषदे करत नाहीत.

© www.madhaveeradhuleer.com

21 October 2014

SUNDAY
MAY '14
# 11
131-234 WK-19

अन्धं तमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते।
ततो भूय इव ते तमो य उ विद्यायां रताः॥९॥

जे अविद्येची उपासना करतात ते घनदाट काळोखात प्रवेश करतात आणि जे विद्येची उपासना करतात ते त्यापेक्षाही दाट अंधारात प्रवेश करतात.

वरवर दिसायला हे बोलणे चमत्कारिक वाटते पण त्याचा खरा अर्थ ध्यानात घ्यायला हवा.

अविद्या म्हणजे परमेश्वराचे विस्मरण! दृश्य जग व शरीर, त्यांचे उपभोग यांनाच सर्वस्व मानून राहणे. देहबुद्धी प्रबळ असणे. अशा लोकांना या लोकात व परलोकात ही दुःख सहन करावे लागते. शरीर भोगांच्या शेवटी भार येतो. अति भोग घेतले तर रोग ठेवलेलेच आहेत.

आज मुलांना रोज चांगले चुंगले, वेगवेगळे खायला घालून ही त्यांना जेवणाचा कंटाळा येतो.

शिवाय स्वतःच्या कर्तृत्वाने केले म्हणजे चिंता आली, ताण आला, व फळही भोगायला लागते. अध्यात्म मार्गाकडे कधी वळलेच नसल्याने परलोकीही सुखाची आशा नसते.

इहलोक व परलोक दोन्हीही त्यांना दुःखदायक ठरतात.

हे सर्वसाधारणपणे पटण्यासारखे आहे. परंतु विद्येची उपासना करणाऱ्यांना का काळोख मिळतो? याचे उत्तर जाणून घ्यायला हवे. परा विद्या व अपरा विद्या अशा दोन प्रकारच्या विद्या आहेत.

वेद, त्यांची षडांगे, उपनिषदे, वेदांत वगैरेचे अध्ययन म्हणजे अपरा विद्या आहे.

नारदमुनी ⟶ सनत्कुमार ⟶ पूर्वाध्ययन ⟶
सर्व विद्यांचे अध्ययन झाले आहे परंतु पराविद्या जाणून जाणली नाही

| MAY 2014 | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

अपरा विद्या शिकून माणसाला गर्व होण्याची फार शक्यता असते व त्या अहंकारामुळे त्या सर्व विद्या फोल ठरतात. त्यामुळे ते अधिकच खोल अंधकारात बुडतात.

एकवेळ अज्ञ परवडला परंतु अहंकारी ज्ञानी महाभयंकर कृत्य करतो. समर्थ रामदासस्वामींनी अशांना पढतमूर्ख म्हटले आहे. असे लोक जडजंबाळ ज्ञानामध्ये अडकतात. त्यांना केवळ शब्दपांडित्य असते. पराविद्येपासून ते फार दूर असतात. या मंत्रात अशा अपरा विद्येचा उल्लेख आहे.

Knowledge is different from information.
परा विद्या - अध्यात्मिक आणि अपरा विद्या - भौतिक

अविद्येच्या मागे लागून आपण यंत्रे निर्माण केली. भौतिक समृद्धी मिळवली, सुबत्ता वाढवली परंतु आंतरिक समाधान मात्र मिळाले नाही. सुखाची साधने मिळवताना सुख मात्र हातातून निसटून चालले आहे. खरे सर्व मिळून संतुष्टी नाही तर उलट धावपळ वाढली.

एखाद्या घाण्यावरच्या बैलासारखे आज आयुष्य झाले आहे. तो बैल मैलो न मैल चालतो पण एकही पाऊल पुढे जात नाही. जीवनाचा हेतू विसरल्याने जीवन व्यर्थ जाते पण शांती, प्रसन्नता मिळत नाही. अंधारात भिरभिरत, गटांगळ्या खात जगावे लागते. हा अर्थ दुसऱ्या ओळीचा आहे.

लंकाधिपती रावण ज्ञानी, वेदसंपन्न, कर्तृत्ववान, तपस्वी असूनही असुर झाला. कारण संस्काराशिवायचे कर्तृत्व राक्षसी असते.

अन्यदेवाहुर्विद्यया अन्यदाहुरविद्यया।
इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ॥१०॥

विद्येचे वेगळेच फळ सांगितलेले आहे आणि अविद्येचे निराळेच फळ सांगितले आहे. ज्यांनी आमच्यासाठी त्याची व्याख्या केली होती त्या बुद्धिमान पुरुषांकडून आम्ही असे ऐकले आहे.

अपरा विद्येने पुस्तकी ज्ञान मिळते पण माणूस अहंकाराच्या आहारी जाण्याची दाट शक्यता असते. त्याने अधोगती होते. असे लोक देहाला सर्वस्व मानतात, दृश्य जगात रमतात. ते कोणत्याही मूल्यांची पर्वा करत नाहीत. ते माणूस म्हणून शिल्लक रहात नाहीत.

परंतु परा विद्या जाणणारा माणूस ब्रह्मपदी पोहोचतो. तो वेगळाच होतो. तोही माणूस म्हणून रहात नाही. तो नराचा नारायण होतो. त्यासाठी आचरण संयमपूर्वक हवे. आत्मानात्मविवेक हवा. बाहेर धावणाऱ्या इंद्रियांना अंतर्मुख करायला हवे. व परमशक्तीचे नित्य स्मरण ठेवून तिचा शोध घ्यायला हवा. असे केले तर माणूस कुठल्या कुठे पोहोचू शकतो.

मात्र या मंत्रात धीर असा नेमका शब्द वापरला आहे. ज्यांना खरोखरच ब्रह्मज्ञान झाले आहे स्थिर बुद्धीने जो त्याचा उपयोग जीवनात करतात स्वानुभवाचे विश्लेषण करता येण्याइतके जे ज्ञानी असतात ते धीर पुरुष होत. सर्वच ज्ञानी पुरुष हे धीर पुरुष नसतात. समाजातील अनिष्ट गोष्टींबद्दल धीर पुरुष स्वतःला जबाबदार धरतो व प्रतिकूल परिस्थितीशी सामना करण्याचा निश्चय करतो. सर्वांना बरोबर घेऊन चालतो.

| MAY | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

वाईट गोष्टी बदलण्यासाठी लोकांचे प्रबोधन करतो. मी दिवा लावला असला तरी त्याचा प्रकाश माझ्यापुरता नाही सभोवार असणाऱ्या पशु-पक्षी, किडा-मुंगी सर्वांनाच प्रकाश मिळायला हवा, सर्वांनी पुढे जायला हवे. माझ्या-बरोबरच सर्वांची प्रगती व्हायला हवी कारण ते सर्व म्हणजे माझेच स्वरूप आहे.

- अनिबदातील अविद्या -

जीवनामध्ये माणसांवर अविद्येचा अंमल चालतो. अविद्या म्हणजे आत्मस्वरूपाचा विसर. अविद्येने जीव भारला जातो. अविद्येच्या पगड्यामुळे जीवाला स्वस्वरूपाचा विसर पडतो. अविद्या म्हणजे आनंदाचा लोप! त्यामुळे अज्ञानाचा अंधकार जीवाला ग्रासतो. आणि त्यातून तो आनंदासाठी दृश्यामध्ये चाचपडत राहतो.

ज्याच्यामध्ये जे नाही ते त्याच्यामध्ये आहे असा भ्रम होणे हा अविद्येचा प्रभाव आहे. मी आनंदस्वरूप आत्मा आहे हे विसरून इंद्रियांच्या द्वारे आनंद मिळण्याची इच्छा करणे ही अविद्येची खरी करामत आहे. अविद्येची पकड घट्ट असते. अविद्येच्या अमलाखाली मनुष्य कधीच शहाणा (अनुभवाने) होत नाही. भय, चिंता संपत नाहीत.

© www.madhaveeraghuveer.com

विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययामृतमश्नुते॥११॥

इथे विद्या म्हणजे परा विद्या व अविद्या म्हणजे अपरा विद्या (भौतिक) आहे. दृश्य जगालाच खरी मानणारी विद्या आहे.

९,१० व ११ व्या मंत्रात विद्या व अविद्या शब्द वेगवेगळ्या अर्थाने वापरले आहेत. ते ध्यानात घेतले नाहीत तर गोंधळ होऊ शकतो.

माणसाला अपरा विद्या पण पाहिजे व परा विद्या सुद्धा पाहिजे. अपराविद्येत यज्ञयाग कसे करावेत याचे ज्ञान होईल. धर्माचरण म्हणजे काय त्याचे ज्ञान होईल. संयम शिकला जाईल. जगात कसे वागावे हे सुद्धा कळेल. उपासना, भक्ती कळेल. थोडक्यात या जगातील त्याचे जीवन योग्य मार्गाने जाऊ शकेल. व स्वर्गादि लोकात जाण्याचे पुण्य त्याला मिळवता येईल.

स्वर्ग ही सुखाची परिसीमा आहे. तिथे रोग, दुःख नाही. तहान भूक नाही. जरामरण नाही. चिंता, थकवा नाही. पुण्य केल्याने अशा स्वर्गाचा लाभ होऊ शकतो. परंतु ती अंतिम स्थिती नाही. त्याने तो ब्रह्म होऊ शकणार नाही.

त्यासाठी त्याला पराविद्येचीच आवश्यकता आहे.

भूः भुवः स्वः महः जनः तपः सत्यम् असे सात लोक आहेत.

गुरुकडून दीक्षा घेऊन गुरुने सांगितलेल्या मार्गाने ज्ञान अपरा विद्येच्या आधारे जास्तीत जास्त सत्यलोकापर्यंत जाता येते परंतु ब्रह्मभूत होता येत नाही.

जो पुरुष अपराविद्या व परा विद्या दोन्ही जाणतो तो अपरा विद्येने जन्ममृत्युच्या पलीकडे जातो व विद्येने अमृताचा भोग घेतो. तो ब्रह्मज्ञानी शब्दे परे च निष्णात असतो. म्हणजे त्याला प्रत्यक्ष अनुभव असतो व शब्दांनी तो सांगण्याचे व तो प्राप्त करण्यासाठी मार्गदर्शन करण्याचे

© www.madhaveeraghuveer.com

| MAY | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

सामर्थ्य त्याच्यात असते तोच सद्गुरु होण्यास योग्य असतो. ब्रह्मविद् ब्रह्म एव भवति।

~~[illegible]~~ हा मंत्र असे सूचित करतो की विश्वातील जीवन ही पारलौकिक जीवनाची पूर्वतयारी आहे.

सर्व जीवनाचे जे अंतिम साध्य जे अमृत जीवन या ऐहिक जीवनातच लाभू शकते.

प्रपंच ही परमार्थाची पाठशाळा आहे.

उपनिषदातील द्वंद्वांच्या जोड्या –

१. ज्ञानमय ईश्वर आणि नामरूपमय निसर्ग
२. त्याग आणि भोग
३. प्राकृतिक कर्म आणि आत्मस्वातंत्र्य
४. स्थिर ब्रह्म आणि व्यापार
५. विद्या आणि अविद्या
६. संभूति आणि असंभूति
७. कर्म आणि ज्ञान

© www.madhaveeraghuveer.com

अन्धं तमः प्रविशन्ति येऽसम्भूतिमुपासते ।
ततो भूय इव ते तमो य उ सम्भूत्यां रताः ॥१२॥

जे अव्यक्तात गढून जातात ते गाढ अंधकारात शिरतात. जे व्यक्तात रमतात ते त्यापेक्षाही घोर अंधकारात शिरतात.

तत्त्व - भगवंत व्यक्ताव्यक्ताच्या पलीकडे आहे.

व्यवहार - माणूस हा विश्वाची प्रतिकृति आहे असे म्हणतात. त्याप्रमाणे विश्वात व्यक्ताव्यक्ताचा खेळ चालला आहे तसाच माणसाच्या अंतरंगातही चालू असतो.

आपल्या इंद्रियांना दिसणारे विश्व हे व्यक्त मानले तरी त्याचे मूळ अव्यक्तात असते.

अव्यक्ताद् व्यक्तयः सर्वाः प्रभवन्त्यहरागमे ।

आपले मन जेव्हा व्यवहारात गुंतलेले असते तेव्हा ते व आपण भगवंतापासून दूर असतो. पण अगदी मनाला आवर घालून गप्प केले तरी त्याला भगवंताचे दर्शन होत नाही. बाहेरून कितीही शांत वाटत असले तरी आत अनेक वासना, विकार दबा धरून बसलेले असतात. मनाचा नुसता निरोध करणारा मनुष्य भगवंतापासून दूरच असतो.

सर्व व्यवहार नीट करत असताना भगवंताचे चिंतन करणे कठीण आहे आणि मनाला दाबून सर्व वृत्तींचा निरोध करणे हे देखील उचित नाही.

यासाठी आपला व्यवहार आणि प्रपंच भगवंताच्या इच्छेने आला आहे अशी मनाची दृष्टी ठेवून कर्म केले तर व्यवहाराची घडी न बिघडता अंतःकरणातील वासना हळूहळू क्षीण होत जातील आणि आपोआप आत भगवंत प्रगटेल.

© www.madhaveeraguruveer.com

संभूति - निर्मिती - सम् + भू सम्यक् निर्मिती
आणि असंभूति म्हणजे काहीही न करणे.
संभूति - जन्म आणि असंभूति - जन्माचा अभाव — शांती अरविंद
जे असंभूतिची उपासना करतात, नाशवंत गोष्टींच्या
मागे लागतात ते जन्म मृत्युच्या चक्रात अडकतात, परंतु जे
ज्ञान मिळवतात, प्रयत्न करतात त्यांचा अहंकार पोसला जातो.
आणि ते घोर अंधकारात जातात.
नवल अहंकाराची गोष्ठी/न लगे अज्ञानापाठी!

| JUN 2014 | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

© www.madhaveeraghuveer.com

MONDAY

MAY '14

# 19

139-226 WK-21

अन्यदेवाहुः संभवात् अन्यदाहुरसंभवात् ।
इति शुश्रुम धीराणां ये नस्तद् विचचक्षिरे ॥१३॥

अर्थ- काही म्हणतात की कार्यब्रह्माच्या उपासनेने फल मिळते. इतर काही म्हणतात की कारणब्रह्माच्या उपासनेने फल मिळते. असे आम्ही ज्ञानी लोकांकडून ऐकले आहे. त्यांनी आम्हाला हे समजावून दिले.

© www.madhaveeraghuveer.com

| MAY | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

सम्भूतिं च विनाशं च यस्तद्वेदोभयं सह।
विनाशेन मृत्युं तीर्त्वा सम्भूत्यामृतमश्नुते॥१४॥

अर्थ- कारणब्रह्म व कार्यब्रह्म ही दोन्ही जो कोणी एकत्रितपणे जाणतो तो कार्यब्रह्माच्या उपासनेने मृत्युला पार करतो आणि कारण ब्रह्माद्वारा अमरत्व प्राप्त करून घेतो.

© www.madhaveeraghuveer.com

☆ अत्यंत महत्वाचा श्लोक.

FRIDAY
MAY '14
23
143-222 WK-21

हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम्।
तत्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ॥१५॥

सूर्य हा जगाचा पोषणकर्ता आहे (पूषन्) तो सविता आहे. परब्रह्माची निर्माण करण्याची शक्ती सवितृ आहे. प्रथम सूर्य आला व नंतर सृष्टीची रचना झाली. प्रथम ॐकार उमटला. या ध्वनितरंगांनी हालचाल झाली. वायु आला. वायुतून अग्नि- सूर्य निर्माण झाला. या सूर्यापासून दिक् व काल निर्माण झाले. या अग्नि, तेजापासून आप म्हणजे पाणी आले. उष्णता व पाणी मिळून जीव सृष्टी वाढली. या सर्व प्राण्यांचे, वृक्षवल्लींचे पोषण करण्यासाठी सूर्याची उत्पत्ती.

आमच्या बुद्धीला पुष्ट करणारा ही हाच तेजोगोल आहे. बुद्धी ही तेजापासून निर्माण झाली आहे. अशा तऱ्हेने बौद्धिक व शारीरिक पुष्टि देणारा तो पूषन्!

हा हिरण्यगर्भ ब्रह्मांडाच्या वरच्या टोकाला आहे. तो झाकणासारखा आहे. हे दार आपण प्रयत्नांनी उघडू शकत नाही. साधक हा अपरा विद्या, गुरु व साधना यांच्या सहाय्याने सत्यलोकापर्यंत पोहोचू शकतो परंतु ब्रह्मांड भेदून परब्रह्मापर्यंत गेलेला नसतो.

ब्रह्मांडाच्या बाहेर पडण्याचा जो मार्ग आहे तो बंद आहे. तिथे हिरण्यगर्भाची चकती बसवली आहे. जसे फळाचे तोंड देठाने झाकलेले असते.

हे दार प्रयत्नांनी उघडता येत नाही. त्यासाठी प्रार्थनेची फार आवश्यकता असते. सूर्य हे त्याच परब्रह्माचे पहिले दृश्य स्वरूप आहे.

प्रथम नादमय प्रकटीकरण - ॐकार
नंतर तेजोमय हिरण्यगर्भ -

| MAY | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

© www.madhaveeraghuveer.com

स्वामी स्वरूपानंद (पावस) यांच्या मते
ती चकती म्हणजे अहंकार आहे. त्या
अहंकाराचे आवरण काढून टाकण्यासाठी मी
असमर्थ आहे. जितका मी तो नाहीसा
करण्याचा प्रयत्न करतो तितका तो वर्धनच
पावतो आहे. तो अत्यंत तेजस्वी असल्याने माझ्या
डोळ्यात प्रकाशस्रोत जाऊन माझे डोळे दीपतात.
त्यामुळे मला स्वतःच्या चैतन्यस्वरूपाचे दर्शन
होऊ शकत नाही. त्यासाठी तुला (सूर्य) प्रार्थना
आहे की तूच हे आवरण दूर कर.
[आपल्या गायत्री मंत्रातही सप्त लोकांचा
उल्लेख आहे. भूः भुवः स्वः आणि आमच्या
बुद्धीला प्रेरणा देणारा तू हो. कारण तू सर्वश्रेष्ठ
आहेस. तुला आम्ही प्रार्थना करतो]
ह्या प्रयोजनासाठी साधक जीवनभर साधना
करतो, त्या साधनांमुळे अहंकार तसूभरही कमी न
होता उलट अधिकाधिक वाढतच जातो. तेव्हा
अहंकाराच्या नाशासाठी चैतन्यस्वरूपाचे अपरोक्षदर्शन
हेच एकमेव साधन आहे.

पूषन्नेकर्षे यम सूर्य प्राजापत्य
व्यूह रश्मीन् समूह ।
तेजो यत्ते रूपं कल्याणतमं तत्ते पश्यामि ।
योऽसावसौ पुरुषः सोऽहमस्मि ॥१६॥

एका परीने ही सूर्याची स्तुति केली आहे.

पूषन्

एकर्षे

यम

प्राजापत्य -

ही सर्व संबोधने वापरुन हा दूर दिसणारा सूर्य, किंवा सूर्यरूपाने दिसणारा हा ब्रह्म पुरुष तोच मी आहे. तेच तेज माझ्यात आहे. सोऽहम् ।
हे सूर्या, माझी वाणी ओजस्वी कर. माझी बुद्धी तीक्ष्ण, सूक्ष्म, एकाग्र कर. माझ्या मनावर चांगले संस्कार कर. आम्हाला त्याग शिकव. आम्हाला द्यायला शिकव. तुझ्या तेजस्वी रूपापर्यंत मला पोहोचायचे आहे. व्यूह रश्मीन् समूह - तुझ्या किरणांना आवरुन घे.

© www.madhaveraghuveer.com

बायबल - जुना करार - मोझेस पर्वत शिखरावर पोहोचतो तेव्हा एका झाडाआडून त्याला तेजःपुंज प्रकाशाचे दर्शन घडते. एका आवाजातून त्याला पादत्राणे काढण्याचा आदेश मिळतो. त्या प्रकाशाच्या दिशेने तो प्रश्न विचारतो - तू कोण आहेस? तेव्हा उत्तर येते हिब्रू भाषेत —— आहिये अशर आहिये म्हणजे
"मी तोच आहे जो मी आहे"

© www.madhaveeraghuveer.com

| JUN | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | ♦ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | ♦ |

वायुरनिलममृतमथेदं भस्मान्तं शरीरम्।
ॐ क्रतो स्मर कृतं स्मर क्रतो स्मर कृतं स्मर॥

हे शरीर पंचमहाभूतांचे बनले आहे. ते पंचमहाभूतात विलीन व्हावे. स्थूल शरीराचे भस्म होऊन जावे. देहावरचे संस्कार बरोबर येत नाहीत.

शीर्यते इति शरीरः - जे झिजते ते शरीर. आणि दहनयोग्यत्वात् इति देहः। जो दहन करायला योग्य आहे त्याला देह म्हणतात. ∴ माझ्या स्थूल शरीराचे भस्म व्हावे आणि माझ्या प्राणाने समष्टि प्राणांशी एकरूप व्हावे. व त्याला ऊर्ध्वगती प्राप्त व्हावी. इथे केवळ वायुचाच उल्लेख आहे कारण प्राणामुळच माझे - मानवाचे अस्तित्व आहे. या भूतलावर माझे स्वतंत्र अस्तित्व मला प्राणामुळेच जाणवते. श्वास हे जिवंत असल्याचे पहिले लक्षण ते श्वास संपले की माझे अस्तित्व रहाणार नाही.

ते प्राण जातेवेळी कृतकर्मांचे संस्कार घेऊन जातात. पाप पुण्य बरोबर घेऊन जातात. त्यामुळे त्यांची फळे भोगण्यासाठी मला पुन्हा प्राण धारण करून शरीर-धारी व्हावे लागते. ते माझे प्राण इतके शुद्ध होऊ देत की ते इला म्हणजे पृथ्वीलाही पोटात घेणाऱ्या ब्रह्म-व्याप्त अनिलामध्ये एकरूप होऊन जाऊ देत. आणि ॐ हे ब्रह्माचे प्रतीक आहे. त्यामुळे अंतकाळी, शेवटच्या क्षणी माझ्या मुखात ॐकार या एकाक्षरी ब्रह्माचा उच्चार व्हावा. ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन्।

क्रतो म्हणजे संकल्प किंवा संकल्प करणारे मन। हे मना तुझ्या खऱ्या स्वरूपाचे स्मरण कर.

तू म्हणजे ती चैतन्यशक्ती आहेस. देह हा वरवरचा आहे. बाकी सर्व उपाधी आहेत. पण खरा तू म्हणजे त्या सच्चिदानंद प्रभूचा अंश आहेस.

त्याची आठवण कर आणि ती आठवण ठेवून केलेस ते स्मर.

त्या परमेश्वराची आठवण ठेवून तू जी जी कर्मे केलीस ती तुला बाधक ठरणार नाहीत. कारण ते परमेश्वराचे काम म्हणून, त्याची इच्छा म्हणून व तू स्वतःला उपकरण मानून जर कार्य केले असशील तर तुला कर्मबंधन पडणार नाही. ज्ञानी पुरुष स्वतःचे शरीर जणू काही मृत्यूला समर्पित करतो.

अस्तः म्हणजे जो व अहे म्हणजे मी या प्राणांमुळे वेगळे वाटत होतो पण स्वस्वरूपाची जाणीव होताच सर्व ग्रंथी सुटतात. आत्मा मायेच्या बंधनातून मुक्त होतो. प्राणतत्त्व म्हणजे आत्मा, तो अमर आहे.

क्रतो या दुसरा अर्थ यज्ञमय प्रभु असा आहे. मला तुझ्या चरणाशी ठेव. माझी मुक्तता कर.

अंतःकरणावर उपासनेचेच शुद्ध संस्कार झाले असल्यामुळे निश्चितपणे उपासकाचा प्राण हा सुसंस्कृत आहे आणि अशा या प्राणाला आदरभाव दाखवण्यासाठी उपासक येथे विनंती करत आहेत. आणि मनाला हळुवारपणे सांगत आहे की हे मना तू या स्थूल शरीराच्या बंधनातून शांतपणे बाहेर पड.

किंवा विनंती ही समाधिसूचक आहे. उपनिषदाचा उपसंहार दर्शविते.

© www.madhaveeraghuveer.com

अग्ने नय सुपथा राये अस्मान्
विश्वानि देव वयुनानि विद्वान्।
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठां
ते नम उक्तिं विधेम॥ १८॥

राये - (रायि - समृद्धी) समृद्धीसाठी (चतुर्थी)
वयुनानि - वस्तो (इथे - शरीर) जुहुराणम् - घातक

जीवनाचे सार्थक करण्यासाठी अग्निला प्रार्थना केली आहे. अग्नीची रुपे सरी किती आहेत —
तो 'वैश्वानर' बनून शरीरात राहतो. आपण खाल्लेले अन्न (चार प्रकारचे) तोच पचवतो.
अग्नि बाहेर राहून अन्न शिजवून आपले पोषण करतो.
'यज्ञातील अग्नि' होऊन आपल्या पुण्याची वृद्धी करतो.
देवतामुख (हव्यवाहन - Messenger of God)
होऊन देवतांना त्यांचा हविर्भाग पोहोचवतो.
'ज्ञानवेद' असल्यामुळे या सृष्टीतील प्रत्येक गोष्ट तो जाणतो. अंतरिक्षात तो वीज बनतो तर द्युलोकात तो हिरण्यगर्भ म्हणून तळपतो.
अशा अग्निला प्रार्थना केली आहे की तू आम्हाला सुपथाने घेऊन चल. त्याने आम्हाला सद्बुद्धी द्यावी.
आम्ही वाईट मार्गाने समृद्धी मिळवू नये. मिळालेली समृद्धी सर्वांनी वाटून घ्यावी. मग आपण उपभोगावी.
अशा रीतीने जगून परमेश्वराचे स्मरण ठेवून शेवटी देवयान मार्गाने आम्ही परब्रह्मापर्यंत पोहोचू तो देवयान मार्गही याच्या प्रकाशाचाच आहे.
आरोग्यं भास्करादिच्छेत् धनमिच्छेत् हुताशनात्।
विद्यां महेश्वरादिच्छेत् मुक्तिमिच्छेत् जनार्दनात्॥
हे अग्नि तू आम्हाला योग्य मार्गाने मिळालेली समृद्धी दे. ती संयमाने उपभोगण्याची सद्बुद्धी आम्हाला दे. त्यातून आमचा ऐहिक व पारमार्थिक उत्कर्ष

© www.madhuveeraghuveer.com

होणार आहे.

हे अग्ने, तू जातवेदस आहेस. तुझ्या सहकार्याशिवाय या जगात काहीही निर्माण करता येणार नाही. प्रत्येक गोष्टीला तू चांगल्या रीतीने जाणतोस.

वयुन म्हणजे निगळले गुंफलेले, ही शरीरे तुझ्यामुळेच अस्तित्वात आली, त्यामुळे त्यांचे प्रयोजन व कार्य तू जाणतोस. परमेश्वराची उपासना कशी करावी याचा ज्ञाता ही तूच आहेस.

वाणीची देवता अग्नि आहे त्यामुळे गुरुमुखातून सन्मार्गाचा सत्कर्माचा उपदेश तूच देत असतोस. आमच्या वाणीला सामर्थ्य तूच दे.

आमच्या मार्गात अडचण आमच्या पापांची आहे. आगस - नकळत घडलेली पापे. कीडा-मुंगी चिरडणे एनस - आपल्या स्वार्थासाठी दुसऱ्याला त्रास देणे.

विचार, वचन, कृती.

अंहस - दुष्ट बुद्धीने दुसऱ्याला त्रास देण्यासाठीच त्रास देणे

आमच्या उन्नतीच्या आड ही पापे येतात. त्यांच्याशी लढायला मी असमर्थ, दुबळा आहे. त्यांचे निवारण तूच कर. त्यासाठी आम्ही तुला वारंवार नमस्कार करतो.

© www.madhaveeraghuveer.com

॥श्री॥

उपनिषदे केवळ हातात पुस्तक घेऊन वाचून शिकता येत नाहीत. त्यासाठी गुरूच्या सान्निध्य राहून ती शिकावी लागतात आणि दुसरा अर्थ उपनिषदात जो विषय मांडलेला आहे जी विद्या सांगितली आहे ती ब्रह्मविद्या आहे. यातील ज्ञेय असणारा विषय दूरचा नाही तर जवळचा आहे. अत्यंत समीप असणाऱ्या विषयाचे ज्ञान उपनिषद देते तर मग मला अत्यंत जवळचे कोण आहे? विश्व → आशिया खंड → भारत → महाराष्ट्र → पुणे → कोथरूड → घुडकड → फ्लॅट → कुटुंबीय → खोली → वस्त्रे → शरीर → इंद्रिये → प्राण → मी – आत्मा.

तुम्ही कोण? असे विचारल्यावर आपण नाव, गाव, हुद्दा, पदवी, नाते सांगतो. पण या सर्वांशिवाय तू कोण आहेस? याचा कधी फारसा विचारच करत नाही. हा विचार आपल्या ऋषींनी केला आहे.

या विश्वात सर्वत्र ईश्वर व्यापलेला आहे. हे विश्व म्हणजेच एक विराट पुरुष आहे. त्याच्या तालाशी आपला ताल जुळवता यायला हवा. एक विराट असा प्रणवध्वनि या अवकाशाच्या पोकळीत निनादत आहे तो ऐकता यायला हवा. त्या विश्वनियंत्याच्या सुशासनात अडथळा न आणता मला वावरता यायला हवे. हे जग सोडून जाताना काही चांगले करता आले तर उत्तमच परंतु निदान माझ्याकडून काही वाईट सृष्टीला घातक गोष्टी घडणार नाही इतका तरी विवेक मी ठेवायला हवा. आणि हे सर्व स्तरांवरोवर वाढून घेताना माझ्या मनुष्यजन्माचे सार्थकही करून घेता यायला हवे. कारण तो दुर्लभ आहे. आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम्।

इतक्या खालच्या पातळीवरचे जीवन न जगता थोडा सूक्ष्म विचार मला करायलाच हवा. असे जर करता आले तर त्या सर्वात्मक सर्वेश्वराचे दर्शन दूर नाही. किंबहुना मी तोच आहे अशी अनुभूती निश्चितच येईल.

©www.madhaveeraghuveer.com

| MAY | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

॥श्री॥

आपल्या अवतीभोवती दिसणाऱ्या निसर्गा विषयी माणसाला कुतूहलही वाटले आणि आकर्षणही वाटले. त्यातूनच अनेक प्रश्न मनात उमटले. आणि त्या प्रश्नांची उत्तरे शोधताना ~~पुन्हा~~ निसर्गच मदतीला आला. द्रष्ट्या पुरुषांनी चिंतनाचा मार्ग निवडला. अशा सततच्या आणि सखोल चिंतनाने ऋषींचे देहभान हरपले. स्थूल मागे पडून एक तरल अवस्था प्राप्त झाली आणि त्या अवस्थेमध्ये झालेल्या आत्मस्वरूपाचे ज्ञान शब्दांमधून प्रगट झाले. मीपणाच्या पलीकडून म्हणजे अतींद्रिय आत्म्याकडून ते शब्द येतात. म्हणून त्यांना अपौरुषेय म्हटले जाते.

उपनिषदालाच दुसरे संज्ञा (नाव) वेदांत असे आहे आणि हे नाव ईशावास्याला विशेषत्वाने लागू होते. कारण ईशोपनिषद हा यजुर्वेदाचा अंतिम अध्यायच आहे. शुक्ल यजुर्वेदाच्या काण्वशाखीय संहितेचा चाळिसावा अध्याय म्हणजे ईशोपनिषद! या आधीच्या ३९ अध्यायात कर्मकांडाचे विवेचन आहे तर या अध्यायात केवळ तत्त्वज्ञान आहे. यालाच वाजसनेय किंवा संहितो उपनिषद असेही म्हणतात. ईशावास्य हे नाव याच्या पहिल्या मंत्राच्या पहिल्या शब्दावरून आलेले नाव आहे. उपनिषद या शब्दाचा आपण सामान्यतः मराठीत नपुंसकलिंगी उल्लेख करीत असलो तरी मूळ संस्कृतमध्ये उपनिषद् ही स्त्रीलिंगी संज्ञा आहे.

केवळ १८ मंत्रांचे हे लहानसे उपनिषद अत्यंत आशयगर्भ आहे. ~~[illegible]~~ टपोऱ्या मोत्यांचा सुबक सर असावा अशी या १८ मंत्रांची उत्कृष्ट जडणघडण यात आहे.

दशोपनिषदांचा अभ्यास जर करता येत नसेल तर केवळ ईशोपनिषदाचा अभ्यास करावा आणि तेही कठीण वाटत असेल तर यातील केवळ १ल्या मंत्राचा अर्थ शब्दशः जाणून घ्यावा आणि त्याची अनुभूति घ्यावी. त्यात मानवाचे कल्याण निश्चित आहे. जीवनाला अभिमुख असणारे तत्त्वज्ञान यात निश्चयपूर्वक सांगितले आहे. या उपनिषदात कुठेही



©www.madhavvairagkar.com

प्रपंच सोडून केवळ अध्यात्ममार्गाने जावे असे दुरान्वयाने सुद्धा सूचित केलेले नाही. उलट रोजचे जीवन अत्यंत उत्कटतेने जगत असताना या सर्व भौतिक पदार्थांच्या मागे असणारे ईश्वरी अधिष्ठान स्पष्ट केले आहे. आपल्या ऋषींनी इथे कुठेही उपदेशाचे डोस पाजलेले नाहीत तर केवळ स्वानुभूति सांगितली आहे. आम्ही असे असे केल्यामुळे आम्हाला हे फळ प्राप्त झाले. आम्हाला जे मिळाले ते तुम्हालाही मिळू शकेल. त्यासाठी हा असा मार्ग आचरता येईल. एवढे आश्वासन आणि दिलासा दिला आहे.

उपनिषदांचे सार म्हणजे भगवद्गीता। परंतु त्यातही ईशोपनिषदाच्या १८ मंत्रांमध्ये १८ अध्यायांचे बीज सापडते. उदा. ईशावास्यमिदं सर्वम् हा शब्दसमूह आणि गीतेतील वासुदेवः सर्वमिति। यात विलक्षण साम्य आहे. तेन त्यक्तेन भुञ्जीथाः या चरणाचाच विस्तार गीतेमधील पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति। यामध्ये केलेला दिसून येतो. आणि यातील दुसरा मंत्र तर सरळ सरळ कर्मयोगाचे प्रतिपादन करणारा आहे. पुढे १६ व्या मंत्रातील व्यूह आणि समूह हे परस्परविरोधी ~~[illegible]~~ शब्द वाटतात. सूर्याचे विखुरलेले आणि एकवटलेले किरण असा अर्थ घेतला तर ईश्वराच्या अमर्याद विभूति आणि पुन्हा सर्व ब्रह्मांड व्यापून असणाऱ्या त्याच परमेश्वराचे एकवटलेले तेज म्हणजेच त्याचे विश्वरूप असादर्शन असा सरळ सरळ अर्थ कुणालाही सहज समजू शकतो.

थोडक्यात काय तर ईश किंवा ईशावास्य उपनिषद हा शुद्ध ज्ञानाचा साठा आहे. यात गुरु शिष्य संवाद नाही तर एका उच्च पातळीवरुन ऋषींनी अखिल मानवजातीला दिलेला संदेश आहे. त्याचे श्रवण-मनन-चिंतन करुन ते तत्वज्ञान जर आपल्या आयुष्यात मुरले तर आपण। आपले दैनंदिन जीवन दरवीळ आनंदपूर्ण करु शकू.

© www.madhaveeraghuveer.com

ईशावास्य हे पूर्ण उपनिषद आहे. पारमार्थिक जीवनाचा परिपूर्ण आराखडा यात आहे. हे उपनिषद केवळ दिशा दाखवण्याचे काम करत नाही, तर आपला हात धरून अपेक्षित मार्गावरून आपल्याला शेवटपर्यंत घेऊन जाते. स्वयमेव नीयमानः असे त्याचे स्वरूप आहे. हे उपनिषद कधी कठीण तर कधी सहज सोपे वाटले तरी अनुभूतिसाठी त्याचा पाठपुरावा करावा. त्यातील अर्थ मनाला भावणे आणि तात्पर्याचा अंगिकार करणे हे महत्त्वाचे आहे. समर्थांच्या शब्दात सांगायचे झाले तर 'समजले आणि वर्तले' असे घडायला हवे.

ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत।
तेन त्यक्तेन भुञ्जीथाः मा गृधः कस्यस्विद्धनम्।

या मंत्रात परब्रह्मवाचक शब्द वापरला आहे तो ईश। ईश्वर म्हणजे मूर्त ब्रह्म। या ईशाने हे सर्व जगतातील जग व्यापलेले आहे. ईश्वर नाही अशी जागा शोधूनदेखील सापडणार नाही. ईश्वराला स्वतःचा आकार नाही परंतु सर्व आकार त्याच्यापासूनच निर्माण झाले आहे. तो या विश्वात घनदाट भरला असून देखील तो विश्वातील उलाढालींनी लिप्त होत नाही. सर्वत्र तो अलिप्त आहे. हे पहिले दोन चरण सहज समजण्यासारखे व पटण्यासारखे आहेत. परंतु त्यामुळे उलट आमच्या श्वासांवर, हालचालींवर, खाण्यापिण्यावर बंधने येतील. कारण ईश्वर सर्वत्र आहे. तो जमिनीतही आहे, तो अन्नात आहे. मग आम्ही जमिनीला पाय लावायचा का नाही! अन्न ग्रहण करायचे का नाही? तर त्याचे उत्तर पुढील चरणात दिले आहे की ही विविधरंगी सृष्टी तुमच्या उपभोगासाठीच आहे. त्या सर्वांचा उपभोग घ्या. पण कसा? तर त्यागपूर्वक उपभोग घ्या. या दृश्य विश्वावर निश्चित माझा अधिकार आहे पण माझा एकट्याचा नाही. अखिल मानवजात, पशु-पक्षी, किडा-मुंगी, वृक्ष वेली या सर्वांचा यावर हक्क आहे. म्हणून मी भोग घेताना इतर सर्वांचा विचार केला पाहिजे. मनुष्य विचारशील आहे. तेव्हा सर्वांना पुरेसे देऊन जे

© www.mahaveeragruwer.com

| JUN | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

उरले सामग्री कृतज्ञतेने स्वीकार करायला हवा. ओरबडून घेता कामा नये. आणि दुसऱ्याच्या धनाचा अपहार माझ्या कडून चुकूनही घडता कामा नये. इथे धन या शब्दात अनेक गोष्टी अनुस्यूत आहेत. एखाद्याची विद्या, कला, श्रम, ~~सौंदर्य~~ लावण्य हे त्याचे धनच आहे. कुणाच्याही परवानगी खेरीज, योग्य मोबदला न देता लुबाडणे ही चोरीच आहे, असे पहिला मंत्र सांगतो. केवळ या मंत्राप्रमाणे जर आचरण केले, आज तरी आयुष्याला त्यागाचा सुगंध लाभेल आणि खऱ्या अर्थाने जगण्याचा आनंद लुटता येईल. पूर्वी आयुर्मर्यादा किमान १०० वर्षे असायची. अशी १०० वर्षे आयुष्य समाधानाने जगा परंतु शेवटपर्यंत कार्यरत रहा असा संदेश दुसरा मंत्र देतो.

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेत् शतं समाः।
एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे।

इहलोकी कर्मे करीतच शंभर वर्षे जगण्याची इच्छा करावी. देहधारी व्यक्तीला याशिवाय दुसरा मार्ग नाही. मनुष्याला साधू कर्माचा लेप लागत नाही. कर्मबंधन पडत नाही. स्वकर्म म्हणजेच स्वधर्म. आयुष्याच्या नाटकामध्ये जी भूमिका वाट्याला आली असेल ती समरसून जगावी. जे काम त्या जगन्नियंत्याने सोपवले असेल ते मन ओतून करावे - मग ते कितीही कमी दर्जाचे, हीन असले तरी - मनापासून करायचे आणि कृतकृत्य होऊन जगाचा निरोप घ्यायचा. ही त्या ईश्वराची सेवाच आहे. आणि जन्म मृत्यूच्या चक्रातून बाहेर पडण्याचा मार्गही त्यातच लपलेला आहे.

मात्र ~~निसर्गाचे हे चक्र~~ ज्यांना समजत नाही ते देहालाच सर्वस्व मानतात. विषयोपभोगात रमतात आणि आत्म्याकडे दुर्लक्ष करतात. शेवटी असुर्या नावाच्या अंधःकारमय लोकाला जातात. असे ३ ऱ्या मंत्रात सांगून ४ थ्या मंत्रात, ~~५ व्या~~ मंत्रात त्या आत्मतत्त्वाचे वैशिष्ट्य स्पष्ट केले आहेत. ते आत्मतत्त्व मुळीच हालचाल न करणारे परंतु तरीही अत्यंत वेगवान आहे. धावणाऱ्या इतरांना ते उभे राहून मागे टाकते असे थोडेसे विरोधाभास वाटणारे वर्णन आहे. यानंतरच गीतेच्या १३ व्या अध्यायातील आत्म्याचे वर्णन करणारे श्लोक आले आहेत.

| JUL 2014 | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |



© www.madhaveeraghuveer.com

THURSDAY
JUN '14
5
156-209 WK-23

त्या
६ व्या मंत्रात एकत्वाची अनुभूती घेणाऱ्या योगी पुरुषाचे वर्णन केले आहे. त्याला सर्वत्र त्या परसत्याचाच अनुभव येतो त्याला मोह, शोक, घृणा कसली असणार? आणि ८ व्या मंत्रात तर त्या तेजस्वी, देहरहित, ज्ञानमयाचे वर्णन ऋषिमुनींनी केले आहे.

आणि पुढील ९-१४ मंत्रामध्ये विद्या-अविद्या, संभूति असंभूति यांचे दाखले देऊन अहंकाराचा अडथळा कसा अध्यात्ममार्गावर बाधक ठरू शकतो ते स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर विद्या आणि अविद्या यांचा योग साधून आत्मज्ञानाकडे लक्ष वेधले आहे. संभूति म्हणजे विकास आणि असंभूति म्हणजे विनाश असे पर्यायी शब्द घेतले तर बराच अर्थ स्पष्ट होऊ शकतो.

१५ वा मंत्र म्हणजे विश्वपोषक अशा प्रभुला प्रार्थना केली आहे. सुवर्णमय पात्राने सत्याचे मुख झाकले आहे. सत्याचा उपासक असणाऱ्या माझ्यासाठी ते तू दूर कर अशी विनंति केली आहे. हिरण्मय पात्र हा शब्द वित्त-मोह सुचवणारा आहे. वित्तमोहाने सत्यदर्शन लोपते आणि मनुष्याकडून प्रमाद घडतो.

१६ व्या मंत्रात यम-सूर्य ही जोड देवता आहे. यम म्हणजे नियमन करणारा तर सूर्य म्हणजे प्रेरणा देणारा आहे. ईश्वरापासून नियमन व चांगल्याची प्रेरणा आहे (१६+१८) व्यूह आणि समूह म्हणजेच विश्लेषण आणि संश्लेषण Analysis & Synthesis

१७ वा मंत्र देहाची अंतिम अवस्था दर्शविणारा आहे. या शरीराचे भस्म होणार आहे. क्रतु हा शब्द इथे संकल्प करणाऱ्या जीवाला उद्देशून वापरला आहे. आणि मृत्युसमयी देहभाव विसरून जावा. ईश्वराविषयी कृतज्ञता असावी. त्याची कीर्ति, गुण, उपकार आठवावे यापेक्षा कल्याणकारक अन्य काहीही नाही. या मंत्रातील क्रतो स्मर कृतं स्मर ही द्विरुक्ति सयुक्तिक आहे.

| JUN | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

© www.madhaveeraghuveer.com

जीवनाचे सार्थक करण्याला
आणि १८ वा अठरव्या मंत्र ही अग्निला केलेली प्रार्थना
आहे. अग्नि हा जातवेदस आहे. त्याच्या सहभागाशिवाय
या जगात कोणतीही निर्मिती नाही. वयुन म्हणजे विणलेली
ही शरीरे त्याच्यामुळेच अस्तित्वात आली. वाणीची
देवता ही अग्निच आहे. आमच्या हातून कळत नकळत घडलेल्या
पापांमुळे आमच्या उन्नतीच्या मार्गात अडथळा येतो. त्या पापांशी
लढण्याचे सामर्थ्य माझ्या अंगात नाही. तेव्हा माझ्यासाठी
हे अग्ने तूच त्यांच्याशी लढ, त्यांचे निवारण कर. त्यासाठी
आम्ही वारंवार तुला नमस्कार करतो.

अशी श्रद्धापूर्वक प्रार्थना केली आहे. आपल्या वाट्याला
आलेले हे आयुष्य निःस्वार्थवृत्तीने आणि आनंदाने कसे जगता
येईल. त्यामध्ये आनंदाची पेरणी करत अगदी कृतार्थतेने
मृत्युला सामोरे जाता येईल. अनिष्ट गोष्टी टाळून या सृष्टी
चक्राशी जुळवून घेता आपल्या जीवनाचा ताल आणि तोल
कसा सांभाळता येईल हे या उपनिषदातून आपल्याला
निश्चितच जाणून घेता येईल आणि जीवन हे ओझे नाही,
ती शोकांतिका नाही तर या अध्यात्ममार्गावरील
आनंदयात्री होण्यासाठी हे उपनिषद आमंत्रण देते आणि
आपला हात धरून कैवल्याच्या मुक्कामापर्यंत घेऊन जाते.

© www.madhaveeraghuveer.com

२४ एप्रिल २०१८

# उपनिषद अभ्यास

उपनिषदातील ब्रह्मज्ञानाला भ. श्रीकृष्णांनी सुंदर रेशमी पोशाख चढवला आणि ते रहस्यमय ज्ञान भगवद्गीतेच्या रूपाने सामान्य माणसाच्या प्रांगणात आणून सोडले. उपनिषदांची लहानशी आवृत्ति म्हणजे भगवद्गीता! Demonetization च्या जमान्यात असे म्हणता येईल की मोठाल्या पेटाऱ्यामध्ये जो खजिना भरला आहे तोच एका सुटसुटीत चेकमध्ये जसा परिपूर्ण असतो तसे, हे आत्मसाक्षात्काराचे गुह्य ज्ञान भगवद्गीतेच्या रूपाने सोपे होऊन आले.

मात्र उपनिषदांच्या खोल अभ्यासावाचून ब्रह्मसूत्रे, भगवद्गीता, भागवत, दासबोध अमृतानुभव किंवा 'Life Divine' हे ग्रंथ यथार्थपणे समजणार नाहीत.

जगाला जन्माला घालणाऱ्या व त्याचे धारण पोषण करणाऱ्या चित्शक्तीचा साक्षात्कार त्यांना झाला. मानवी मनाला व इंद्रियांना सदैव टवटवीत ठेवणारे मूलतत्त्व कोणते याचा शोध घेण्यासाठी काही ऋषींनी एकांतवास पत्करला आणि त्यांना अंतर्यामी आत्मरूपाने स्फुरणाऱ्या स्वयंप्रकाश चैतन्याचा साक्षात्कार त्यांना झाला. विश्वाला सदैव गतिमान ठेवणारे आणि माणसाला जिवंत ठेवणारे चैतन्य एकच आहे याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांना आला. माणसासकट सर्व विश्वाला अंतर्यामीपणाने व्यापून पुन्हा शिल्लक रहाणाऱ्या त्या चैतन्याला त्यांनी ब्रह्म हे नाव दिले.

ब्रह्म म्हणजेच सद्वस्तु! ब्रह्म म्हणजेच सन्मात्र! ते सत्याचे सत्य आहे. ते केवळ आहे, शुद्ध आहे, अस्तित्वरूपाने आहे. ब्रह्म आहे म्हणून सर्व आहे परंतु कोणतीही मानवी कल्पना ब्रह्मापर्यंत पोहोचू शकत नाही. ∴ त्याचे वर्णन करता येत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

उपनिषदात ब्रह्माची मूर्त व अमूर्त अशी दोन रूपे सांगितली आहेत. ते अमुक ठिकाणी आहे असे नाही. कारण ते नाही असे ठिकाण नाही. ब्रह्म अशी कोणती वस्तु नाही. ब्रह्माला काळ स्पर्श करु शकत नाही. ब्रह्माची व्याख्या करता येत नाही. माणसाची वाणी तिथे लंगडी पडते "ब्रह्म कशासारखे ही नाही. पण ते कशाहून निराळे ही नाही." ब्रह्म अनंत, अपार आहे.

कारण ब्रह्म आणि कार्यब्रह्म

अविद्या – विश्वामध्ये सर्वव्यापीपणाने कार्य करणारी माया निरनिराळ्या व्यक्तींमध्ये प्रकट होते, तेव्हा तिला अविद्या म्हणतात. अविद्या म्हणजे आत्मस्वरूपाचा, ईश्वराचा विसर होय. अविद्या म्हणजे आनंदाचा लोप होय.

अविद्येच्या अमलाखाली वावरणारा मनुष्य कधीच शहाणा होत नाही. त्यामुळे त्याच्या जीवनातील भय व चिंता कधीच संपत नाही.

अविद्या हा काही जीवाचा मूळ स्वभाव नाही. कारण मनुष्य जीवनात इतकी दुःखे भोगतो पण त्याची सवय काही होत नाही. कधीही त्याला दुःख नकोच असते. कारण त्याचा मूळस्वभाव दुःखशून्य आहे. अर्थाचा अनर्थ झाला की दुःख निर्माण होते. त्यासाठी अविद्येचा नाश करणारी सुविद्या जरूर आहे.

© www.madhaveeraghuveer.com

## – ईशावास्य –

⑤ जगातील सर्व घटना ईश्वराच्या इच्छेनेच, सत्तेने घडत असतात. मात्र प्रत्येक वेळी एखादी वस्तू किंवा व्यक्ति हे निमित्त असते. म्हणून प्रपंचामध्ये कुणी आपले नुकसान करत असते तेव्हा योग्य मार्गाने त्याचा प्रतिकार करावा. पण त्याच वेळी त्या व्यक्तीविषयी द्वेष किंवा मत्सर मनात येऊ देऊ नये.

दुसरी गोष्ट अशी की ईश्वराला जगाची काळजी आहे. तो स्वतः आनंदमय। मंगलमय आहे. तो जे जे घडवून आणतो ते हिताचे असते कल्याणाचे असते. जीवनात येणाऱ्या सुखदुःखांच्या प्रसंगांना आनंदाने तोंड देणे म्हणजेच त्यागाने भोग घेणे.

मनाचे समाधान व शांति न बिघडता भोग भोगले तर ते भोगून न भोगल्याप्रमाणेच आहेत. देहाच्या सुखामागे जितके जावे तितके आपण ईश्वरापासून (आनंदापासून दूर जात असतो.

| JUL | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

© www.madhaveeraghuveer.com

(२) कुर्वन्नेवेह ---- --

माणसाचे वैशिष्ट्य असे की तो देहाने कर्म करत असताना मनाने ईश्वराशी जोडलेला राहू शकतो. आणि सत्पुरुष नेमके तेच करतात. आणि सामान्य मनुष्य मात्र कर्मफळाला चिकटून राहतो. त्यामुळे सत्पुरुषाचे मन आनंदात राहते तर सामान्य मनुष्य काळजी, तळमळ, चिंता यांनी भरून जाते. त्यासाठी सत्पुरुष आपल्या अंगी असणारी सूक्ष्मात विहार करण्याची शक्ती उपयोगात आणतो.

ज्याने असा अभ्यास सुरू केला त्याला आयुष्याची शंभर वर्षे जास्त वाटणार नाहीत. त्याला जगण्याचा कंटाळा येणार नाही.

तो सुखाचे भोग आपणहून मागत नाही. परंतु मिळाले तर ईश्वराची इच्छा म्हणून स्वीकार करतो. तसेच दुःख टाळण्याचा प्रयत्न जरूर करावा. परंतु जर ते अटळ असतील तर ईश्वरेच्छा समजून ते भोगण्यासाठी तयार रहावे.

गुरुभक्त वृद्धपणी सर्व इंद्रिये थकली असताना आनंदात कसे असावे हे मनाला पटवण्यासाठीच ईश्वराने जिवंत ठेवले आहे.

भोपळा बांधून पोहोणाऱ्याला जसे पाण्याचे भय वाटत नाही त्याचप्रमाणे ज्याने ईश्वराच्या स्मरणाला धरून ठेवले असेल त्याला १०० वर्षे जगण्याचे श्रम होत नाहीत. देहाच्या कोणत्याही अवस्थेत ईश्वराला चिकटून राहण्याची युक्ती मात्र साधायला हवी.

© www.madhaveeraghuveer.com

(3)

असुर्या नाम ते -----

आत्मज्ञानावाचून मानवी जीवन व्यर्थ आहे. शरीर, मन आणि आत्मा ही त्रयी मिळून मनुष्य बनतो असा उपनिषदांचा सिद्धांत आहे. यापैकी आत्मा तेवढा 'सत्' म्हणजे शाश्वत असून शरीर आणि मन असत् अशाश्वत - नश्वर आहेत.

जे सत् असेल त्याची उपासना करणे आणि जे असत् आहे [illegible] योग्य किंमत ओळखून त्याचा [illegible] [illegible] बुद्धि [illegible] [illegible] आहे सदसद्विवेकबुद्धि [illegible]

जे सत् असते, ते पूर्ण, शुद्ध, आनंदरूप, शांत असते म्हणून आत्मा आनंदरूप आहे. मात्र शरीर व मन यांना सर्वस्व मानून आत्म्याला विसरणे म्हणजे आत्महत्या करण्यासारखेच आहे.

आपण ज्या कामासाठी जन्माला आलो ते काम पूर्ण न झाल्याने पुन्हापुन्हा जन्म घ्यावा लागतो. याचाच अर्थ नापास झाल्याने पुन्हा त्याच यत्तेत बसावे लागते.

जगातील इतर वस्तू व भोगाच्या नादी लागल्याने मुख्य काम विसरून जाते. या अज्ञानातून बाहेर पडण्याचा निश्चय आजच नव्हे आत्ताच केला पाहिजे. त्यासाठी नामस्मरणाने सुरुवात करावी.

© www.madhuveeraghuveer.com

(8)

FRIDAY
JUN '14
13
164-201 WK-24

अनेकदा मनसो - - - -

© www.madhaveeraghuveer.com

| JUN 2014 | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

(५)

तदेजति तन्नैजति - - - -



© www.madhaveeraghuveer.com

(६)



यस्तु सर्वाणि भूतानि - - -

© www.madhaveeraghuveer.com

(६)

TUESDAY

JUN '14

17

168-197 WK-25

यस्मिन् सर्वाणि भूतानि - - -

| JUN | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | ♦ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | ♦ |

© www.madhaveeraghuveer.com

(c)

स पर्यगात् च शुक्रम् ——————

| JUL 2014 | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

© www.madhaveeraghuveer.com

(e)



अन्धं तमः प्रविशन्ति - - - - -

जाणीव, नेणीव भगवंती नाही.
कळणे व दोन्ही आत्मज्ञानाला बाधक आहेत.

ज्याप्रमाणे सूर्याजवळ रात्र आणि दिवस असा भेद नाही, त्याचप्रमाणे भगवंताजवळ जाणणे व नेणणे असा भेद नाही. ज्ञान आणि अज्ञान हे मानवी शरीरातील भेद आहेत.

एखादा मनुष्य अज्ञानाने भगवंताला विसरला काय किंवा दुसरा एखादा ज्ञानाचा अभिमान झाल्याने विसरला काय, दोघेही भगवंतावाचून दूरच रहातात. दोघांजवळ भगवंताला पहाण्याची दृष्टिच नसते.

त्यातल्या त्यात अज्ञानी एकवेळ परवडला पण ज्ञानगर्वाने फुगलेला मनुष्य अधिक आंधळा असतो. ~~xxx~~ ती खरी दृष्टी येण्यासाठी आपले ज्ञान आणि अज्ञान दोन्ही त्याच्या पायी अर्पण करून त्याला शरण जावे. अनन्यतेने त्याला प्रार्थना केली तर, या दोन्हीच्या पलीकडे जाण्याची युक्ती साधता येईल.

नवल अहंकाराची गोठी न लगे अज्ञानापाठी
ज्ञान्याच्या झोंबे कंठी।

| JUN 2014 | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

© www.madhavvedraghuveer.com

१० ११



अन्यदेवाहुर्विद्यया ----
विद्यां चाविद्यां च ----

जगाचे ज्ञान प्रपंच यशस्वी करते तर आत्मज्ञान संपूर्ण समाधान देते.

ज्या जगात आपण आपले दैनंदिन जीवन जगतो, त्या जगात देहाला काही सुखसोयी आवश्यक असतात. त्या सोयी स्वाधीन करून घेण्यासाठी दृश्याचे ज्ञान आवश्यक असते. दृश्याचे ज्ञान मीपणाने मिळवता येते तर आत्म्याचे ज्ञान मीपणा बाजूला ठेवून मिळवावे लागते. मात्र हा मीपणा बाजूला ठेवण्याची कला आत्मज्ञानी पुरुषाकडून शिकावी लागते. आणि सत्संगतीमध्ये आत्मज्ञानाचा [struck out] निश्चित मार्ग ऐकायला मिळतो आणि समजतो.

© www.madhaveeraghuveer.com

अन्धं तमः प्रविशन्ति ------

भगवंत हा व्यक्त आणि अव्यक्त यांच्या पलीकडचा आहे.

जे पिंडी ते ब्रह्मांडी - माणूस ही विश्वाची प्रतिकृति आहे. विश्वाप्रमाणेच माणसाच्या अंतरंगात व्यक्ताव्यक्ताचा खेळ चालला आहे.

इंद्रियांना दिसणारे रूप हे व्यक्त मानले तर त्याचे मूळ अव्यक्त मानावे लागेल.

जागेपणी व स्वप्नामध्ये चालणारे मनाचे व्यापार ही व्यक्त अवस्था तर सुषुप्तिमधील मनाची शून्यावस्था ही अव्यक्त मानावी लागेल.

आपले मन जेव्हा जागेपणाच्या व्यवहारात गुंतलेले असते, तेव्हा ते भगवंतापासून अत्यंत दूर असते. हे तर निश्चित! परंतु मनाला आवरून जरी त्याला गप्प केले तरी भगवंताचे दर्शन होतच नाही, उलट आत वासना विकारांचा धुमाकूळ चाललेला असतो. कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्।
कर्मेन्द्रियैः कर्मयोग मिथ्याचारः स उच्यते।।

मग करायचे तरी काय? व्यवहार नीट करण्यासाठी कर्म नीट करावे लागते.

म्हणजे व्यवहार उत्तम करून भगवंत चिंतन करणे आहे. आणि मनाला वाचून सर्व वृत्तींचा निरोध करणेही " "

त्यासाठी आपला व्यवहार आणि प्रपंच भगवंताच्या इच्छेने आला आहे अशी मनाची दृष्टी ठेवून कर्म केले तर व्यवहाराची घडी न बिघडता अंतःकरणातील वासना हळूहळू क्षीण होत जातील आणि आपोआप भगवंत आत प्रकट होईल.

परब्रह्म
सामान्य ⟵⟶ विशेष (जीव)

| JUN | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

© www.madhaveeradhuveer.com

(83) (84) कोरी चुनरिया आत्मा मोरी मैल है मायाजाल
वो दुनिया मोर बाबुलका घर ये दुनिया ससुराल ||

अन्यदेवाहुः सम्भवात् अन्यदाहुरसम्भवात् |
सम्भूतिं च विनाशं च - - - - - -

अव्यक्त ब्रह्म आणि व्यक्त ब्रह्म या दोन्हीची उपासना आवश्यक आहे.

कारण ब्रह्म → कार्यब्रह्म Creater → Creation.

संभूति — संभवन — ज्याचा जन्म होतो ते म्हणजेच कार्यब्रह्म

असंभूति — ज्याचा जन्म होत नाही ते म्हणजेच कारणब्रह्म

| कार्यब्रह्म | कारणब्रह्म |
|---|---|
| विशेष पदार्थांचे विश्व | सामान्यांचे विश्व |
| दृश्य, सगुण – साकार | अदृश्य – सगुण निराकार |

खरे तर कार्यब्रह्म व कारणब्रह्म ही एकाच परब्रह्माची दोन अंगे आहेत.

निर्गुण निराकार ब्रह्म हे सर्वांच्या अतीत आहे परंतु तिथपर्यंत पोहोचण्यासाठी सगुणोपासनेचा मार्गच धरावा लागेल.

कार्यब्रह्म — विस्तार पावलेले ब्रह्म — विश्वाची गती वर्तुळाकार आहे. आपण आता परीघावर उभे आहोत. या वर्तुळाला केंद्रबिंदू आहे. जन्म – मृत्यु किंवा निर्मिती – समाधि एकाच प्रक्रियेची दोन टोके आहेत. हे ज्याला समजते त्याला मृत्युचे भय उरत नाही.

दृश्याचे ज्ञान नको असे गुरु म्हणत नाहीत मात्र त्याची किंमत ओळखून वागा एवढेच सांगतात.

ज्या रूपामध्ये ब्रह्म अधिक प्रमाणात झळकते त्याला विभूति म्हणतात. भगवंताचे अवतार आणि ब्रह्मज्ञानी सद्गुरु हे विभूतिच आहेत.

---

समुद्रात माणूस बुडाल्यावर त्याला समुद्राचे ज्ञान होत नाही पण त्याचे अथांगपण कळते. तसे आत्मदर्शनाने (विदेही) जीव ब्रह्मस्वरूप होतो. मानवी दर्शन तिथे कळणे उरत नाही. कळणे मुळातच शून्य होते. मानवी कल्पना तिथे लटक्या पडतात.

| JUL | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

(१५)

MONDAY
JUN '14
23
174-191 WK-26

हिरण्मयेन पात्रेण----

भगवंताला पाहण्याची दृष्टी ही काही निराळीच आहे. विश्वामध्ये सगळीकडे भगवंत भरून राहिला आहे ही गोष्ट खरी असली तरी तो आम्हाला दिसत नाही कारण त्याच्यावर मायेचे आवरण असते. मूळ भगवंत अत्यंत सूक्ष्म असला तरी दृश्य जडाचे पांघरूण घेऊन तो विश्वामध्ये विकास करतो. आपली बुद्धी जडाशी म्हणजे दृश्याशी चिकटलेली असल्यामुळे तिला भगवंताचे ज्ञान होऊ शकत नाही. आपली बुद्धी साधनाने सद्बुद्धी बनली पाहिजे. सद्बुद्धी म्हणजेच प्रतिभा होय. ही प्रतिभा मला प्राप्त होऊ दे अशी प्रार्थना या मंत्रात केली आहे. प्रतिभा जागी होण्यासाठी अंतरंगात समूळ परिवर्तन झाले पाहिजे हे परिवर्तन उपासनेने घडून येते आणि त्यासाठी भगवंताची पूजा, प्रार्थना, उपासना व नामस्मरण सांगितले आहे.

श्री० अरविंद → दैवी शक्तीचे अवतरण
जीवाचे आरोहण

मीलनबिंदू.
प्रतिभेचा परमोत्कर्ष - १. अल्पावधित ग्रंथनिर्मिती अनेक विषयांचा अभ्यास.
२. दीर्घकाळपर्यंत - ५५ वर्षे - सावित्री महाकाव्याची निर्मिती, अपौरुषेय वाणी, कथन, व्याख्यान

परमात्म्याचा १ला गुण — तो सर्व पाहतो. हृदयस्थ परमात्मा
२रा गुण - त्याची पसरलेली किरणे तो आवरून घेऊ शकतो
पसरलेली किरणे ध्यान करणे म्हणजे आवरलेला आत्मदर्शन
३रा गुण - यम - नियमन, शासन

| JUN | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

४ था गुण - तो परम कल्याणमय आहे.
हे ४ गुण आत्मसात करील तो स्वतः परमात्मस्वरूप बनतो.

(१६)



पूषन्नेकर्षे यम सूर्य ----

या मंत्रामध्ये सूर्याच्या ठिकाणी - प्रतीक रुपाने - ईश्वराचे ध्यान करणे करावे हे सांगितले आहे.

वेदांमध्ये व उपनिषदांमध्ये विश्व निर्माण करुन त्याला सांभाळणाऱ्या (पूषन्) दिव्य अव्यक्त ब्रह्माला सूर्याची उपमा दिलेली आढळते. रोज दिसणाऱ्या सूर्यासारखे अनेक सूर्य या ब्रह्मांडात आहेत. ते सारे प्रगट ब्रह्म आहेत. मात्र या मंत्रातील सूर्य म्हणजे अप्रगट ब्रह्म आहे. आपण जो सूर्य पाहतो तो निर्मित आहे. परंतु ऋषींना त्याचा निर्माता पहायचा आहे.

रविचंद्राचा तू निर्माता। २।२७।----

तुझिया श्वासे पान हलते।
स्पर्शे तुझिया फूल फुलते।
तेज झळाळत गगनही झुलते।
रविचंद्राचा तू निर्माता॥ ३॥
देऊळ तूचि तूच मूर्ती
तूच आरती पूजा भक्ती
तूच असता माझी स्फूर्ती
मागायाचे काय अनंता --- ॥२॥

न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः। तमेव भान्तमनुभाति सर्वं तस्य भासा सर्वमिदं विभाति॥

रवि शशी अग्नी नेणती ज्या रुपा॥
न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः।

सूर्य - सूरिभिः गम्यते इति सूर्यः। महापुरुष ज्याला प्राप्त करुन घेतात तो सूर्य! तोच परमात्मा।

© www.madhaveeraghuveer.com

| JUL | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

WEDNESDAY
JUN '14
25
176-189 WK-26

वायुरनिळ -----

अमृतत्व हे जन्माचे सार्थक आहे. जीवनात मनुष्य सर्व गोष्टी मिळवतो मात्र खरे जे मिळवायला हवे तेच विसरतो. आपली सर्व खटपट भगवंताच्या दिशेला जोड करून घडायला हवी. निदान अंतकाळी भगवंताचे दर्शन घडावे, मग देहाचे भस्म झाले तरी फिकीर नाही, त्यासाठी आपल्या पूर्ण आयुष्याचा विचार करणे आवश्यक आहे. अगोदर कधीच नाम घेतले नसेल तर शेवटी तरी कसे येणार? ∴ अभ्यास लवकर सुरु करावा.

| JUN | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | ♦ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | ♦ |



© www.madhaveeraghuveer.com

अग्ने नय सुपथा ----

हे अग्निदेवा, आमच्या कर्मफळांचे भोगण्यासाठी आम्हाला सन्मार्गाने घेऊन चल. तू समस्त ज्ञान आणि कर्म यांना जाणणारा आहेस. आमचे पाखंडपूर्वक पाप नाहीसे कर असे तुला नम्र वाणीने विनवीत आहे.

अग्नि हा ईश्वराचे प्रतीक आहे. तो सदा ऊर्ध्वगामी आहे. म्हणूनच दृश्यातून अदृश्याकडे, स्थूलातून सूक्ष्माकडे, अनेकातून एकाकडे नेणारा आहे. त्या दृष्टीने इंद्रियांच्या पकडीतून सुटून हृदयात उतरायला अग्निलाच बळ लागते. ज्ञानाच्या अग्नि पेटवणारी चेतना किंवा जाणीव वरतीकडे प्रवाहित करावी तिकडे वाहते. एकदा का जाणीव शुद्ध झाली की माणूस वाकड्या बुद्धीपासून मुक्त होतो. बुद्धी शुद्ध झाली की तिच्यामध्ये शरणागतीची क्षमता येते. शरणागतीचा आरंभ नम्रतेने नमस्कार व प्रार्थना यापासून होतो. त्याचे पर्यवसान ईश्वरदर्शनामध्ये घडून येते.

© www.madhaveeraghuveer.com

Listen to your heart It may be on your left But it is always Right

Expect nothing & you will never be Disappointed!

© www.madhaveeraghuveer.com

| JAN 2015 | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

||श्री||

न जन्म कुछ न मृत्यु कुछ
इतनी सिर्फ बात है।
किसीकी आँख खुल गयी
किसीको नींद आ गयी॥

तोच वदवितो या ओठांनी
तोच लिहवितो या बोटांनी।
जे जे सुंदर उदात्त मंगल
तोच करवितो या हातांनी॥

जाता जाता गाईन मी
गाता गाता जाईन मी
गेल्यावरही या गगनातील
ताऱ्यांमधुनि राहीन मी॥

प्रकृतिसारखे चालावे
परी अंतरी शाश्वत ओळखावे।
सत्य होऊनी वर्तावे
लोकां ऐसे॥

उन्हासारखे सुखही सांडते
तरी न घ्यावे मान कुणा।
स्वतःच पडला मिटून त्याला
स्वर्ग दिला तरी तोही उणा।

नको घाबरू परत आवरू
अनावरा आकाश खुले।
पल्याड आहे प्रकाश तिथून
ओंजळीत घेऊनी फुले।

© www.madhavraghuveer.com

## Next Year Planner

**January** | **February**

मैं उस प्रभु का सेवक हूँ
जिसे अज्ञानी लोग मनुष्य कहते हैं।

Be always ready to receive the Divine
For he may visit you at any moment

जो भगवान को चुनता है, समझ लो
भगवान ने उसे पहले से ही चुन लिया है।

जो कर्म करी अहेतु
वेद व्यास त्यास कळो न कळो रे।
ओळख पटली ज्यास स्वतःची
देव तया मिळो न मिळो रे॥

**March** | **April**

© www.madhaveeraghuveer.com